मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in | E mail - dainikyuvakaadhar@gmail.com | facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी




■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १९४ ■ बुधवार, २५ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# देशभरात लॉकडाउन-इंधन संपल्याची अफवा; पेट्रोलसाठी पहाटे 5 पासून नागरिक रांगेत, चिंता वाढली!

**दैनिक युवक आधार**

मुंबई : आखातातील युद्धाची झळ बसत असतानाही भारतात सध्या पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू आहे, असे प्रशासनाकडून वारंवार सांगितले जात आहे, तरी पेट्रोल-डिझेल संपल्याच्या अफवांमुळे देशात काही जिल्ह्यांमध्ये पेट्रोलपंपांवर नागरिकांनी सोमवारी रात्री आणि मंगळवारीही रांगा लावल्या होत्या. त्यामुळे काही ठिकाणी पेट्रोलपंप बंद करावे लागले, तर काही ठिकाणी वादावादीच्या घटनाही घडल्या.

कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात पेट्रोलपंपांवर तुफान गर्दी उसळली. उन्हाच्या ३७ अंश तापमानातही नागरिकांनी भल्या मोठ्या रांगा लावल्याने पंपचालक व कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली.जळगावमध्ये ६ पंप 'कोरडे'ठाकजळगावात इंधन कंपन्यांकडून लोड उशिराने दाखल झाल्याने मंगळवारी सकाळी शहरातील ६ पेट्रोल पंपांवरच्या इंधनाने तळ गाठला. त्यामुळे 'पेट्रोल-डिझेल संपले' या अफवेला बळ मिळाले आणि सोमवारनंतर मंगळवारीही इंधन भरणाऱ्यांच्या पंपांवर रांगा लागल्या. सायंकाळी ६ पैकी तीन पंपांवर साठा उपलब्ध झाल्यानंतर ग्राहकांसाठी खुला करण्यात आला.नागपूरमध्ये लांब रांगा नागपूर शहरातही पेट्रोल पंपावर वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागले. नंदनवन, सक्करदरा, गुरूदेवनगर, पूर्व वर्धमन नगर, पंचशील चौक, वर्धा रोड, संविधान चौक, राहाटे कॉलनी गोरक्षण, हिंगणा रोड आदी पंपांवर रांगा लागल्या होत्या. या रांगांमुळे अनेक ठिकाणी वाहतूक जाम झाली होती. पेट्रोल पंपांवर गर्दीमुळे पोलिस बंदोबस्त होता. दुसरीकडे, इंधन टंचाईच्या भीतीमुळे बुधवारी पहाटे ५ वाजल्यापासून पेट्रोल पंपावर नागरिकांना गर्दी केल्याचे पाहायला मिळाले.



## थोडक्यात

### वैष्णवी रायकर हिचा राज्यस्तरीय पत्रलेखन स्पर्धेत द्वितीय क्रमांक



**दैनिक युवक आधार**
**सतीश शिंदे /मिरजगाव प्रतिनिधी** : रेसिडेन्शियल हायस्कूल मधील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी वैष्णवी राजू रायकर हिने डाकघर पत्र लेखन स्पर्धा 2025-26 मध्ये राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या स्पर्धेत राज्यभरातून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामधून वैष्णवीने आपल्या उत्कृष्ट लेखनकौशल्य, प्रभावी विचारमांडणी व सर्जनशीलतेच्या जोरावर हे यश मिळवले.या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य पोकळे सर, वर्गशिक्षक ढगे सर तसेच इंग्रजी विषयाच्या शिक्षिका ठुबे मॅडम यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तिच्या या यशामुळे शाळेचा व परिसराचा गौरव वाढला असून सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तिला मार्गदर्शन करणारे तिचे शिक्षक व शाळा प्रशासन यांचे देखील पालकांनी आभार व्यक्त केले.

### श्रीराम जन्मोत्सव हिंदू एकता दिना निमित्त ह.भ.प श्री.संजय महाराज हिवराळे यांचे उमरी येथे २५ मार्च रोजी किर्तन



**दैनिक युवक आधार :**
**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** उमरी येथे श्रीराम जन्मोत्सव हिंदू एकता दिना निमित्त श्रीराम जन्मोत्सव समिती, विश्व हिंदू परीषद, बजरंग दलाच्या वतीने तीन दिवस विविध धार्मिक भरगच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ मार्च रोजी रात्री ८ वाजता हिंदु धर्मभूषण अखिल भारतीय वारकरी संघाचे राष्ट्रीय सचिव ह.भ.प श्री.संजय महाराज हिवराळे (आळंदी देवाची) यांचे बुधवारी दि २५ मार्च रोजी रात्री ८ वाजता उमरीत भव्य किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि २६ मार्च गुरुवार रोजी उमरी येथील जुन्या गांवातील श्रीसिताराम मंदिर येथे भव्य श्रीराम जन्मोत्सव सोहळा व महाप्रसादा चे आयोजन. दि २७ मार्च शुक्रवारी ध्वजारोहण, महाआरती आणि उमरी शहराच्या मध्यवर्ती भागातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम जन्मोत्सव समिती, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्याव तीने करण्यात आले आहे.

## प्रभाग ८ मध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर व अनाधिकृत वाहन पार्किंग वर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ८ मध्ये अनधिकृत टपऱ्या व फेरीवाल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात नगरसेविका सौ. बायजा बबन बारगजे यांनी महापौर श्री. नितीन पाटील यांना निवेदन देत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, प्रभागातील आठवडे बाजारामुळे मुख्य रस्ते व फुटपाथवर अनधिकृतपणे फेरीवाले बसत असून त्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. फुटपाथवर टपऱ्यांनी अतिक्रमण केल्याने पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागत आहे.तसेच बाजार संपल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचत असून दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. काही ठिकाणी रस्त्यालगत पक्क्या अनधिकृत शेड्स उभारण्यात आल्याने समस्या अधिक गंभीर बनली आहे.याशिवाय, सेंट जोसेफ शाळेजवळ काही चारचाकी टेम्पो चालकांनी



अतिक्रमण करून गाड्या उभ्या करून व्यवसाय सुरू केल्याने वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. या टेम्पो धारकांवरही कारवाई करून अतिक्रमण हटवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ८ मधील अनधिकृत फेरीवाले, टपऱ्या तसेच अतिक्रमण करणाऱ्या टेम्पो धारकांवर तातडीने निष्कासन कारवाई करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व पंचकुंडात्मक रुद्रयाग सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव- :शहरातील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व पंचकुंडात्मक रुद्रयाग सोहळ्याचे आयोजन दि. २४ मार्च २०२६ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.

या भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन रंगनाथ नाना काळे व सौ. ज्योतीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

चार दिवसीय या सोहळ्यात विविध धार्मिक विधी,पूजापाठ, हवन,अभिषेक, वेदघोष तसेच प्रवचन व कीर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २४ मार्च रोजी मंगल कलश स्थापना,गणेश पूजन व प्रारंभिक विधींनी कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.दि. २५ व २६ मार्च रोजी विविध देवतांची पूजा, रुद्रयाग,मंत्रोच्चार व धार्मिक विधी पार पडणार असून भाविकांना आध्यात्मिक अनुभव घेण्याची संधी मिळणार



आहे.सोहळ्याचा मुख्य दिवस दि. २७ मार्च असून या दिवशी प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण, महाअभिषेक व महाआरती असे प्रमुख कार्यक्रम होणार आहेत.तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाची वेळ दररोज रात्री ८ ते ११ अशी ठेवण्यात आली असून विविध मान्यवर, कीर्तनकार व प्रवचनकार यांची उपस्थिती लाभणार आहे.या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक, समिती सदस्य व स्वयंसेवक परिश्रम घेत असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून या पुण्यसोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पनवेलमध्ये डॉक्टरांचा 'जश्न-ए-ईद' सोहळा उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने रमजान ईदनिमित्त 'जश्न-ए-ईद' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन पनवेल काँग्रेस भवन येथे करण्यात आले होते. सर्व डॉक्टरांमध्ये स्नेहभाव आणि सलोखा वाढावा, या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात ५० हून अधिक डॉक्टरांनी सहभाग नोंदवला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक लतीफ शेख उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. आरिफ दाखवे यांनी भूषवले. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात रमझान महिन्याचे महत्व सांगून सर्व धर्मातील उपासाचे अध्यात्मिक व वैज्ञानिक अधिष्ठान अधोरेखित केले. विशेष म्हणजे, उपस्थित सर्व डॉक्टरांनी पारंपारिक पेहराव परिधान करून ईदचा आनंद लुटला. डॉ. अमित दवे यांनी कार्यक्रमाचे मराठी आणि उर्दूतून खुमासदार सूत्रसंचालन केले. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. वैभव मोकल यांनी संघटनेच्या कार्यविस्ताराबद्दल सांगून सर्व उपस्थितांचे आभार मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. फिरोज शेख, डॉ. अमिना कच्छी, डॉ. इस्माईल शेख, डॉ. महेक पठाण, डॉ. सना सिलोत्री आणि डॉ. ताझिन मुल्ला यांनी अथक परिश्रम घेतले. काँग्रेस भवन येथे पार पडलेल्या या सोहळ्यात एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत आणि स्नेहभोजनाचा आस्वाद घेत सर्व डॉक्टरांनी उत्साहात सहभाग घेतला.

## वृत्तपत्रांना 150% जाहिरात दरवाढ द्या – व्हॉईस ऑफ मीडिया चे खालापूर तहसीलदारांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे :** राज्यातील वृत्तपत्र उद्योग आर्थिक संकटात सापडला असून त्यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने तातडीने 150 टक्के जाहिरात दरवाढ द्यावी, अशी मागणी व्हॉईस ऑफ मीडिया (VOM) इंटरनॅशनल फोरमच्या वतीने करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आज (दि. 24 मार्च) खालापूर येथे तहसीलदार अभय चव्हाण यांना निवेदन देण्यात आले.

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये सुरू असलेल्या लाक्षणिक आंदोलनाचा भाग म्हणून खालापूर येथेही हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अभिजीत देरेकर, कोकण प्रमुख कुमार कडलग, खालापूर तालुका अध्यक्ष दीपक जगताप, उपतालुका अध्यक्ष सुधीर देशमुख , संतोष शेवाळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा



चौथा स्तंभ मानला जातो. शासनाच्या योजना, निर्णय आणि धोरणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य वृत्तपत्रांद्वारे केले जाते. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये या उद्योगावर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

सन 2019 पासून आजतागायत कागद, प्रिंटिंग साहित्य, केमिकल्स, वीज व मनुष्यबळ या सर्व खर्चांमध्ये सुमारे 150 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. मात्र शासनाकडून मिळणाऱ्या जाहिरात दरांमध्ये कोणतीही लक्षणीय वाढ झालेली नाही. त्यामुळे राज्यातील लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले असून अनेक वृत्तपत्रे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, अशी खंत यावेळी व्यक्त करण्यात आली.

व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेने शासनाकडे विविध महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये सर्व वृत्तपत्रांसाठी किमान 150 टक्के जाहिरात दरवाढ तातडीने लागू करणे, ई-टेंडर जाहिराती पूर्ण स्वरूपात वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करणे, तसेच किमान जाहिरात आकार 200 चौ.से. निश्चित करणे या प्रमुख मागण्या आहेत. याशिवाय शासकीय जाहिरातींचे देयक 30 दिवसांच्या आत अदा करण्यात यावे आणि विलंब झाल्यास बँक दराने व्याज देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

पत्रकारांच्या हितासाठीही काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. पत्रकारिता क्षेत्रात 10 वर्षे सेवा पूर्ण करणाऱ्या पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका देण्यात यावी, तसेच 20 वर्षे सेवा पूर्ण करून 55 वर्षे वय असलेल्या पत्रकारांना शंकरराव चव्हाण पत्रकारिता पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, यासाठी अटी शिथिल कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच मोठ्या वृत्तपत्रांप्रमाणेच लघु व मध्यम वृत्तपत्रांनाही जाहिरात वितरणात समान संधी मिळावी, यावरही संघटनेने भर दिला आहे. काही ठिकाणी शासकीय कार्यालये माहिती खात्याला वगळून थेट निवडक वृत्तपत्रांना जाहिराती देत असल्याची बाब गंभीर असल्याचे सांगत, सर्व जाहिराती माहिती व जनसंपर्क विभागामार्फतच देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

### कळंबोलीत रिक्षा चालक-मालक संघटनेची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : कळंबोलीत 23 मार्च रोजी रिक्षा चालक-मालक संघटनेची बैठक पार पडली. यावेळी पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले, खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुजावर, प्रादेशिक परिवहन विभाग पनवेलचे मोटर वाहन निरीक्षक माळवे तसेच रिक्षा युनियन अध्यक्ष पनवेल, कळंबोली, खारघर उपस्थित होते. पनवेल, कळंबोली, खारघर, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, तळोजा, कामोठे, परिसरात रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे रिक्षा चालकांच्या खूप तक्रारी वाहतूक पोलीस आणि आरटीओकडे येतात. अनेकदा रिक्षा चालक हे भाडे नाकारतात तसेच चालकाच्या बाजूला प्रवाशाला बसवतात. युनिफॉर्म घालत नाहीत तसेच प्रवाशांशी सौजन्याने वागत नाहीत त्यांच्याशी वाद घालतात. या साऱ्या वाहतूक नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत असल्याने वाहतूक विभागाकडे तक्रारी येतात.

### राम नवमीच्या पावन मुहूर्तावर अंतर योग फाउंडेशन तर्फे प्रभू श्रीरामांचा अद्वितीय उपदेश कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** राम नवमीच्या पावन मुहूर्तावर अंतर योग फाउंडेशन तर्फे जीवन आमूलाग्र बदलणारा प्रभू श्रीरामांचा अद्वितीय उपदेश श्री राम गीता शिबिर ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी यांच्या दिव्य, रसाळ वाणीतून पुरुषोत्तम प्रभु श्रीरामांनी आपल्या लाडक्या बंधू लक्ष्मणाला दिलेल्या अमूल्य उपदेशातील गूढ रहस्य सांगणार आहेत.यावेळी सुख-दुःख का येते?, मन शांत आणि स्थिर कसे ठेवावे?, कर्म आणि ज्ञान यात श्रेष्ठ काय?, अहंकार, मोह आणि भीतीवर विजय कसा मिळवावा? आदी सर्व प्रश्नांवर ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी आध्यात्मिक सद्गुरु, क्रांतिकारी महानायक रामबाण उत्तरदेणार आहेत. 26 मार्च 2026 पासून हा कार्यक्रम सुरु होणार असून वेळ




सायं. 6 ते 8:30 पर्यंत ऑनलाइन (Zoom) होणार आहे. कार्यक्रमासाठी आजच नोंदणी साठी 7710948461 साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# तिघी या चित्रपटाला नवी मुंबईकर प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**(वाशी) :** नवी मुंबईमध्ये "तिघी" या चर्चित महिला-केंद्री चित्रपटाच्या विशेष शो आणि आणि पत्रकार परिषदेद्वारे एक अविस्मरणीय सिनेमॅटिक संध्याकाळ नवी मुंबईकरांना अनुभवायला मिळाली. मंगळवार, १७ मार्च २०२६ रोजी रघुलीला मॉल आईनॉक्स थिएटर येथे आयोजित या कार्यक्रमाला प्रेक्षक आणि माध्यमांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्व शो हाऊसफुल ठरले, ज्यातून महिलांच्या भावना, अनुभव आणि प्रवास सुंदरपणे मांडणाऱ्या या चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणि प्रशंसा स्पष्टपणे दिसून आली.

या चित्रपटात भारती आचरेकर, नेहा पेंडसे, सोनाली कुलकर्णी यांच्या प्रभावी भूमिका असून दिग्दर्शिका जीविविषा काळे यांच्या उपस्थितीने कार्यक्रमात विशेष उर्जा आणि उत्साह निर्माण झाला. कलाकारांनी माध्यमांशी आणि प्रेक्षकांशी संवाद साधत कार्यक्रम अधिक रंगतदार बनवला. त्यामुळे हा केवळ चित्रपटाचा प्रीमियर न राहता अर्थपूर्ण सिनेमाचा एक संस्मरणीय उत्सव ठरला.

हा कार्यक्रम सौ. टीना अमरदीप आणि श्री. अमरदीप सिंह विज — संस्थापक, रोनक ॲडव्हर्टायझिंग यांच्या वतीने सादर करण्यात आला. तसेच डॉ. निवेदिता श्रेयंस, सौ. प्रतिभा वैद्य आणि श्री. निखिल वैद्य यांनी प्रती भारत आर्ट फाउंडेशनच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन



केले. सिनेमा, माध्यम आणि समाज यांना एकत्र आणून कथाकथनाद्वारे जागरूकता, संवाद आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश होता.

या वेळी सिनेमा आणि समाज यांचा एक सुंदर संगम अनुभवायला मिळाला. उपस्थित मान्यवर आणि माध्यम प्रतिनिधींनी चित्रपटाच्या प्रभावी कथानकाचे, दमदार अभिनयाचे आणि संवेदनशील विषय मांडणीचे मनापासून कौतुक केले. प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने हे स्पष्ट झाले की, मनोरंजनासोबतच विचार प्रवृत्त करणाऱ्या चित्रपटांना आजच्या काळात मोठी मागणी आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना सोनाली कुलकर्णी यांनी सांगितले की "मी या चित्रपटाचा भाग असल्याबद्दल खूप आनंदी आहे, कारण एक अभिनेत्री म्हणून आणि एक स्त्री म्हणूनही हा चित्रपट माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. हा चित्रपट महिलांना आणि प्रत्येकालाच स्वतःसाठी उभं राहण्याचा एक प्रभावी संदेश देतो.

प्रेक्षकांनी या चित्रपटाला आणि त्याच्या संदेशाला ज्या संवेदनशीलतेने आणि आपुलकीने स्वीकारलं आहे, त्यामुळे मी भारावून गेले आहे. डॉ. निवेदिता श्रेयंस आणि रोनक ॲडव्हर्टायझिंग यांचे मनःपूर्वक आभार, त्यांनी या चित्रपटाचे महत्त्व ओळखून पिल्लई कॉलेज, टिळक कॉलेज, बकलीवाल कॉलेज तसेच रोनक ॲडव्हर्टायझिंग टीमसाठी विशेष स्क्रीनिंगचे आयोजन केले. यांच्या सहकार्यासाठी मी मनापासून आभारी आहे."

या उपक्रमाबाबत बोलताना श्री. अमरदीप सिंह विग आणि सौ. टीना अमरदीप यांनी सांगितले की, सिनेमा हा लोकांना जोडणारा, कथा सांगणारा आणि सकारात्मक बदल घडवणारा अत्यंत प्रभावी माध्यम आहे. कलाकार, माध्यम आणि प्रेक्षक यांना एकत्र आणून हा कार्यक्रम संवाद आणि जागरूकतेसाठी प्रेरक ठरला.

उत्साही वातावरण, सकारात्मक प्रेक्षक प्रतिसाद आणि माध्यमांशी झालेल्या प्रभावी संवादामुळे "तिघी" चित्रपटाचा प्रीमियर एक मोठे यश ठरला. कला, कथाकथन आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.हा कार्यक्रम पुन्हा एकदा सिद्ध करतो की रोनक ॲडव्हर्टायझिंगसारखे दूरदृष्टी असलेले सहयोगी आणि डॉ. निवेदिता श्रेयंस यांसारखे समाजाभिमुख व्यक्तिमत्व एकत्र आले तर सिनेमा हा केवळ मनोरंजन न राहता समाजाला जोडणारा आणि प्रेरणा देणारा एक प्रभावी माध्यम बनू शकतो.

# खरात प्रकरण: निष्पक्ष तपासासाठी 'अंनिस'चे मुख्यमंत्र्यांना साकडे

### सिल्लोड उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत निवेदन; दोषींवर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** नाशिक येथील तथाकथित ज्योतिष अशोक खरात याने अध्यात्म आणि फलज्योतिषाच्या नावाखाली महिलांचे शोषण केल्याच्या गंभीर आरोपाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणाचा तपास कोणत्याही दबावाशिवाय निष्पक्ष, व्यापक आणि पारदर्शक पद्धतीने करून दोषीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीचे निवेदन 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'च्या (अंनिस) सिल्लोड शाखेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. सोमवारी (ता. २३) उपविभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार वनमाला उप्पिलवाड यांनी हे निवेदन स्वीकारले.



सध्या अटकेत असलेल्या संशयित आरोपीच्या पाठीशी काही राजकीय हितसंबंध असण्याची शक्यता निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. समाजातील असुरक्षितता, भीती आणि मानसिक विवंचनेचा गैरफायदा घेऊन महिलांची फसवणूक करणाऱ्या अशा प्रवृत्तींविरुद्ध 'महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायद्या'ची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे 'अंनिस'ने म्हटले आहे.

**प्रमुख मागण्या**

संशयित आरोपी खरात याच्या राजकीय संबंधांची आणि मालमत्तेची सखोल चौकशी व्हावी.जादूटोणाविरोधी कायद्याच्या कक्षेत 'फलज्योतिषा'चाही समावेश करून त्यावर कायदेशीर नियंत्रण आणावे.पीडित महिलांना प्राधान्याने कायदेशीर मदत (Legal Aid) आणि पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी शासनाने राज्यव्यापी प्रबोधन मोहीम राबवावी.या निवेदनावर 'अंनिस'चे जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे, ॲड. संतोष झाल्टे, डॉ. प्रकाश बिऱ्हाडे, जगदीश बेदवे, नारायण फाळके, डॉ. व्यंकटेश लांब, डॉ. अनिरुद्ध मोरे, सचिन दांडगे, प्राचार्य अर्चना अहिरे, नितीन निकम, हरिदास वाघ, राजू रोजेकर, प्रल्हाद पगारे, यशवंत साळवे, अशोक सोनवणे, बी. के. दांडगे, के. आर. डुबे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पालोद आरोग्य उपकेंद्रात क्षयरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड**

:-तालुक्यातील पालोद येथील आरोग्य उपकेंद्र येथे 'जागतिक क्षयरोग दिना'चे औचित्य साधून विशेष तपासणी आणि मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करून त्यांना या आजाराचे गांभीर्य आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित संशयित रुग्ण आणि ग्रामस्थांना क्षयरोगाचे वेळेत निदान करण्यासाठी 'थुंकी नमुना' तपासणीचे महत्त्व पटवून देण्यात आले. "आरोग्यं परमं धनम्" या उक्तीचा आधार घेत, जर वेळेत निदान झाले आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने पूर्ण उपचार घेतले, तर क्षयरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो, असा विश्वास आरोग्य तज्ज्ञांनी यावेळी व्यक्त केला. शासनाच्या क्षयरोगमुक्त भारत मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.या प्रसंगी मुख्य वैद्यकीय




अधिकारी डॉ. सुरेश शिंदे, डॉ. पूजा सपकाळ, डॉ. किरण सोनवणे यांनी रुग्णांची प्रत्यक्ष तपासणी करून त्यांना औषधोपचारांबाबत मार्गदर्शन केले. आरोग्य निरीक्षक योगेश भोटकर यांनी वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व विषद केले. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सोनाली गोडबोले आणि सागर गायकवाड यांनी निदानासाठी आवश्यक तांत्रिक बाबींची माहिती दिली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी आरोग्य सेविका कांताताई हासे, आशा पर्यवेक्षिका ज्योती दौड, नीता राऊत यांच्यासह आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिराला पालोद परिसरातील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

# सिल्लोड-सोयगाव मतदार यादीत १०-१२ हजार 'बोगस' मतदार? भाजपचे तहसीलदारांना निवेदन; सखोल चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** योगेश पालोदकर सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघाच्या (१०४) मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता, विलंब आणि राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षातर्फे करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन भाजपच्या शिष्टमंडळाने आज तहसीलदार कार्यालयात दिले.

मतदार याद्यांच्या प्राथमिक पडताळणीत गंभीर बाबी समोर आल्या असून शेजारील जिल्ह्यांतील मतदारांची नावे नियमबाह्यपणे या मतदारसंघात समाविष्ट करण्यात आली आहेत. हे 'लोकप्रतिनिधी कायदा १९५०' मधील तरतुदींचे उल्लंघन असल्याचा दावा भाजपने केला आहे.




**निवेदनातील मुख्य मुद्दे:**

मयत व दुबार नावे: तालुक्यात सुमारे १२,००० मयत मतदारांची नावे अद्यापही यादीत कायम आहेत. तसेच अनेक महिलांची नावे माहेर आणि सासर अशा दोन्ही ठिकाणी नोंदवलेली आहेत.

राजकीय हस्तक्षेप: स्थानिक आमदारांच्या प्रभावाखालील खाजगी संस्थांचे शिक्षक व नगरपरिषद कर्मचारी पडताळणी प्रक्रियेत हस्तक्षेप करत असून, 'बीएलओ'ची लॉगिन उपकरणे अनधिकृत व्यक्ती वापरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.परदेशी नागरिकांचा संशय: मतदारसंघात काही संशयास्पद परदेशी नागरिकांची नावे समाविष्ट असल्याची बाब निवेदनात नमूद करण्यात आली असून, ही लोकशाहीसाठी चिंताजनक असल्याचे म्हटले आहे.राजकीय

> **निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी, अन्यथा भाजपच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल."**
> **- मनोज मोरेल्लु (अध्यक्ष, भाजप सिल्लोड मंडळ)**

दबावामुळे बोगस नावे वगळली जाऊ नयेत, यासाठी प्रक्रियेत जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे. शहरात केवळ १५% काम पूर्ण झाले असून, ही प्रशासकीय निष्क्रियता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.यावेळी भाजप सिल्लोड मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लु, किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मकरंद कोर्डे, कमलेश कटारिया, नगरसेवक गणेश भुमकर, शामराव आळणे, मोतीराम मिसाळ, योगेश साळवे, अमोल कुलकर्णी, वशिम बागवान व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# सिल्लोड तालुक्यात 'रोहयो' आणि 'घरकुल' कामांना गती द्या

### सभापती अनिता बनकर यांचे ग्रामसेवक, रोजगार सेवकांना कडक निर्देश

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत विनाविलंब पोहोचवण्यासाठी प्रशासन आणि क्षेत्रीय यंत्रणेने प्रभावीपणे काम करावे, असे निर्देश पंचायत समितीच्या सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांनी दिले. पंचायत समिती कार्यालयात आयोजित ग्रामसेवक व रोजगार सेवक यांच्या विशेष आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

या बैठकीत 'रोहयो' अंतर्गत तालुक्यातील वैयक्तिक सिंचन विहिरी, गायगोठे, शेततळे आणि वृक्ष लागवड या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या लाभार्थ्यांची कामे अपूर्ण आहेत किंवा ज्यांची देयके तांत्रिक कारणास्तव थकीत आहेत, अशा प्रकरणांचा तातडीने निपटारा करून लाभार्थ्यांना दिलासा देण्याच्या सूचना सभापतींनी दिल्या.

आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात



पाणीटंचाई भासू नये, यासाठी ग्रामसेवकांनी गावपातळीवर आढावा घेऊन टंचाई निवारणाचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेसह घरकुल अंतर्गत लाभार्थ्यांना कोणताही त्रास होऊ नये आणि सिंचन विहिरींचे ऑनलाईन काम अचूकपणे पूर्ण करावे, यावरही त्यांनी भर दिला.

या बैठकीला उपसभापती भगवान आहेर, गटविकास अधिकारी रत्नाकर पगारे, मंडळाध्यक्ष एकनाथ हिवाळे, माजी पं.स. सदस्य अनिल खरात, अंकुश कोठाळे, किशोर गवळे, विनोद चव्हाण, दिपक सपकाळ, विजय वानखेडे, भाऊसाहेब उबाळे यांच्यासह तालुक्यातील सर्व ग्रामसेवक, रोजगार सेवक व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# इंदापूर तालुक्यात गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी कडक कारवाईचा इशारा

### पुरवठा निरीक्षण अधिकारी सपन गडमवार यांचे स्पष्ट निर्देश

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**

: देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर परगुती गॅसचा तुटवडा होण्याची शक्यता व्यक्त होत असताना इंदापूर तालुक्यात गॅसचा काळाबाजार करणाऱ्यांना गय केली जाणार नाही,असा कडक इशारा तालुका पुरवठा निरीक्षण अधिकारी सपन गडमवार यांनी दिला आहे. घरगुती गॅस व्यवसायासाठी वापर करणारे,तसेच अवैध पद्धतीने साठा करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्याचा अहवाल जिल्हा पुरवठा विभागाकडे पाठवून कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



इंदापूर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली विशेष टीम तयार करण्यात आली असून तालुक्यातील गॅस व इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्व गॅस एजन्सींना कडक सूचना देण्यात आल्या आहेत. झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून पुरवठा निरीक्षण अधिकारी सपन गडमवार यांनी सर्व गॅस एजन्सींना कठोर शब्दांत इशारा दिला आहे.या निर्णयामुळे नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला असून तालुका पुरवठा प्रशासनाने गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सज्जता दाखवली आहे.

> **सध्या इंदापूर तालुक्यात व्यावसायिक गॅस मिळत नसल्यामुळे तालुक्यातील हॉटेलमध्ये घरगुती गॅसचा वापर होत असल्याचे जाणवत असून त्यामुळे घरगुती गॅस नागरिकांना मिळत नाही त्यामुळे तालुका पुरवठा कार्यालयाने तालुक्यातील हॉटेलांची तपासणी करून घरगुती गॅस वापरत असलेल्या हॉटेलांवर योग्य कारवाई करण्यात यावी.**
> **मा. विकास प्रकाश क्षत्रिय**
> **अध्यक्ष इंदापूर तालुका माहिती अधिकार समिती**

# पुर्णा नगर परिषद अतिक्रमण मोहीम : नागरिकांत संभ्रम, प्रशासनावर पक्षपातीपणाचे आरोप

**दैनिक युवक आधार**
**पुर्णा | प्रतिनिधी शिवाजी लोंढे**

: शहरात गेल्या दोन दिवसांपासून नगर परिषदेच्या वतीने ध्वनीप्रक्षेपणाद्वारे (अनाउन्समेंट) अतिक्रमणाबाबत सूचना देण्यात येत होत्या. नाल्यांवर तसेच शासकीय कार्यालयांच्या कंपाऊंड भिंतीलगत केलेले अतिक्रमण संबंधितांनी स्वखर्चाने तात्काळ काढून घ्यावे, अन्यथा मंगळवारपासून नगर परिषद प्रशासन अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू करेल, असे स्पष्ट करण्यात आले होते. तसेच अतिक्रमण असलेल्या ठिकाणी असलेल्या टपऱ्या, स्टॉल आणि हातगाडे जप्त करण्याचा इशाराही देण्यात आला होता.

मात्र या घोषणांनंतर शहरातील नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासन खरंच निःपक्षपातीपणे सर्व अतिक्रमणांवर कारवाई करणार का, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नागरिकांच्या मते, शहरातील काही ठिकाणी प्रभावशाली व्यक्तींचे अतिक्रमण अद्याप कायम असून त्यावर कारवाई होताना दिसत नाही.

पोस्ट ऑफिस, बीएसएनएल कार्यालय परिसर, मशिदीसमोरील भाग तसेच मच्छी मार्केटजवळील काही बांधकामांबाबत वारंवार तक्रारी होत असतानाही ठोस कारवाई झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः काही नगरसेवकांच्या नातेवाईकांनी सार्वजनिक जागांवर केलेल्या अतिक्रमणाकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

याशिवाय शहरातील मुख्य बाजारपेठ आणि छोट्या-मोठ्या गल्ल्यांमध्ये नाल्यांवर वाढवलेली दुकाने, घरांच्या शिड्या व बाल्कनीमुळे रस्ते अरुंद झाले असून वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. तरीही या मोठ्या अतिक्रमणांवर कारवाई होईल का, याबाबत नागरिक



साशंक आहेत.

गेल्या वर्षीही अशाच प्रकारे अतिक्रमणविरोधी मोहीम राबविण्यात आली होती. मात्र त्यावेळी केवळ रेल्वे स्टेशन परिसरातील हातावर पोट असलेल्या काही लहान दुकानदारांवरच कारवाई करण्यात आली आणि मोहीम अचानक थांबवण्यात आली होती. त्यामुळे यंदाही केवळ लहान व्यावसायिकांनाच लक्ष्य केले जाईल का, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, संबंधित परिसरात वाहतूक कोंडीचे मुख्य कारण वाईन शॉप, बिअर शॉप आणि देशी दारूची दुकाने असल्याचा मुद्दाही नागरिकांनी उपस्थित केला आहे. त्या भागात तीन मंदिरे असतानाही अशा दुकानांना परवानगी कशी देण्यात आली, असा सवालही नागरिकांकडून केला जात आहे.

एकीकडे मोठ्या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष आणि दुसरीकडे छोट्या विक्रेत्यांवर कारवाई होत असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. त्यामुळे "गरिबांवर अन्याय होऊ नये आणि कारवाई सर्वांवर समान निकषांवर व्हावी," अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

आता प्रत्यक्ष मोहीम सुरू झाल्यानंतर नगर परिषद प्रशासन खरंच सर्वसमावेशक आणि निःपक्षपाती कारवाई करते का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# रामनवमी निमित्ताने आयोजक आणि शांतता कमिटी सदस्यांची बैठक



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : 24 मार्च रोजी मंथन हॉल, पनवेल येथे रामनवमी आयोजक आणि शांतता कमिटी सदस्य यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल, भाऊसाहेब ढोले यांनी सूचना केल्या. पालखी मिरवणूक दरम्यान वाहतुकीस अडथळा होणार नाही. यावेळी गर्दी व्यवस्थापन करून स्वयंसेवक नेमावे. ध्वनी प्रदूषण नियम आणि नियंत्रण नियमावली 2000 चे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रशासनाशी समन्वय साधावा. कोणत्याही प्रकारचे प्रक्षोभक घोषणा, आक्षेपार्ह बॅनर, आणि पोस्टर लावू नयेत. नवी मुंबई व्हाट्सअप बाबत माहिती देऊन फॉलो करण्याबाबत सूचित करण्यात आले. यावेळी सायबर फ्रॉड बाबत थोडक्यात माहिती दिली तसेच अमली पदार्थांचे दुष्परिणाम व हेल्पलाइनची माहिती दिली. कार्यक्रमादरम्यान वापरण्यात येणाऱ्या लेझर लाईटचा वैमानीकांना त्रास होत असून लेझर लाईट न वापरण्याचे सूचित करण्यात आले. या बैठकीला खांदेश्वर पोलीस ठाण्याचे स्मिता ढाकणे, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे गजानन घाडगे, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे नितीन ठाकरे, अभिजीत अभंग उपस्थित होते.

# बोरी-वालचंदनगर गटातील लोडशेडिंग वेळेत बदल करण्याची मागणी



**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील बोरी-वालचंदनगर गटातील संपूर्ण गावांमध्ये सध्या संध्याकाळी ६ ते १० या वेळेत लोडशेडिंग (भारनियम) सुरू आहे.या वेळेत शेतकरी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर त्रस्त होत असून विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असल्याने अभ्यासात अडथळा निर्माण होत आहे.तसेच अंधारामुळे चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्या मा.सौ. निर्मला सागर मिसाळ यांनी ऊर्जा भवन,बारामती विभागाचे मुख्य अभियंता मा.श्री.पेठकर साहेब यांना निवेदन सादर केले. निवेदनात सायंकाळी ६ ते १० या वेळेतील लोडशेडिंग रद्द करून त्याऐवजी सायंकाळी ५.३० ते ७.३० व पहाटे ५ ते ७ या वेळेत लोडशेडिंग करावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी व शेतकऱ्यांच्या कामकाजाचा विचार करून ही मागणी मान्य करावी.

अन्यथा शेतकरी व विद्यार्थी समवेत जंक्शन चौक किंवा M.S.E.B.च्या मुख्य कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल,असा इशारा देण्यात आला आहे.या निवेदनामुळे स्थानिक पातळीवर शेतकरी व विद्यार्थ्यांच्या समस्या अधोरेखित झाल्या असून प्रशासनाने तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# “मालेगाव तालुक्यातील ‘विकास’ पाहून जनता झाली फिदा पण हा विकास की विनाश?”

## मालेगाव–आमखेडा व बोरगाव–पिंपळा–आमखेडा रस्त्यांची दयनीय अवस्था; आमदार-खासदारांना जनतेचा थेट सवाल

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : (वाशीम)मालेगाव तालुक्यातील मतदारसंघातील विकास पाहून वाशिम जिल्ह्यातील जनता सुद्धा फिदा झाली आहे — मात्र हा विकास आहे की विनाश, असा तीव्र सवाल आता सर्वसामान्य नागरिकांकडून विचारला जात आहे. निवडणुकांपूर्वी मोठमोठ्या घोषणा, विकासाच्या गप्पा आणि आश्वासनांचा पाऊस पडला होता; पण वास्तवात रस्त्यांची अवस्था पाहता नागरिकांच्या अपेक्षांचा चक्काचूर झाल्याचे चित्र समोर येत आहे.

मालेगाव ते आमखेडा हा मुख्य रस्ता आज अक्षरशः मृतावस्थेत पोहोचला आहे. रस्त्यावर सर्वत्र पसरलेली खडी, खोल खड्डे, उखडलेले डांबर आणि असमतल पृष्ठभाग यामुळे प्रवास करणे अत्यंत धोकादायक झाले आहे. वाहन चालवताना चालकांना सतत धोका जाणवतो,तर दुचाकीस्वारांना तर जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागतो. अनेक ठिकाणी रस्त्याचे अस्तित्वच दिसेनासे झाले असून, हा रस्ता आहे की खडीचा मळा,असा प्रश्न पडतो.

याहून गंभीर बाब म्हणजे पायदळ चालणाऱ्या नागरिकांचीही प्रचंड गैरसोय होत आहे. वृद्ध, महिला, शाळकरी मुले यांना या मार्गावरून चालणेही कठीण झाले आहे. काही ठिकाणी तर लोकांना रस्त्याऐवजी कडेला असलेल्या





दैनिक

युवक आधार

Epaper.YuvakAadhar.In

संपादक : श्री. संतोष शिवदास आमले

मालेगाव–आमखेडा मार्ग झाला ‘मृत्यूचा सापळा’; अधिकाऱ्यांची केवळ व्हिजिटची भा

“पत्रकारांना टाळाटाळ, जनतेच्या जीवाशी खेळ; मालेगाव–आमखेडा रस्त्यावर प्रशासन कधी जागे होण

मातीच्या वाटेचा आधार घ्यावा लागत आहे. अपघाताची शक्यता दिवसेंदिवस वाढत असून, प्रशासन मात्र या गंभीर परिस्थितीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते.

**विशेषत:**

बोरगांव–पिंपळा–आमखेडा हा रस्ता तर पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. या मार्गाची अवस्था इतकी भयावह झाली आहे की “विकास” या शब्दाचा मागमूसही येथे सापडत नाही. शेतकरी आपल्या शेतमालाची वाहतूक करताना त्रस्त झाले आहेत, विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचणे कठीण झाले आहे, तर रुग्णवाहिकांसाठी हा मार्ग अक्षरशः जीवघेणा ठरत आहे. एखाद्या आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर मदत मिळेल की नाही, याचीही शाश्वती राहिलेली नाही.

स्थानिक नागरिकांचा संताप आता उफाळून आला असून, लोकप्रतिनिधींविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. निवडणुकीच्या वेळी जनतेच्या दारात येऊन विकासाचे स्वप्न दाखवणारे आमदार आणि खासदार आता मात्र या समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. “फक्त भाषणांत विकास दाखवायचा आणि प्रत्यक्षात जनतेला खड्ड्यांत ढकलायचं का?” असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत.

“जर खरोखरच विकास झाला असेल, तर आमदार-खासदारांनी एकदा तरी या रस्त्यावरून प्रवास करून दाखवावा,” असे उघड आव्हान देत नागरिकांनी आपला संताप व्यक्त केला आहे. या भागातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागत असल्याने प्रशासनाविषयी रोष वाढत चालला आहे.

**यापूर्वीही दैनिक युवक आधार या वृत्तपत्राने या रस्त्यांच्या दयनीय अवस्थेबाबत तब्बल चार वेळा सविस्तर बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत. मात्र, तरीदेखील आमदार, खासदार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने याची कोणतीही ठोस दखल घेतलेली नाही.वारंवार मुद्दा उपस्थित करूनही काम होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, “बातम्या छापूनही उपयोग नसेल तर जनतेने न्याय कुणाकडे मागायचा?” असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.**

दरम्यान, तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. “आता फक्त आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष काम हवे,”

अशी ठाम भूमिका नागरिकांनी घेतली असून, येणाऱ्या काळात या प्रश्नावर संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# पालोदमध्ये 'ईद'चा उत्साह; शिरखुर्म्याच्या गोडव्याने जपला सामाजिक सलोखा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** परस्परांच्या धर्माचा आदर आणि सण-उत्सवातील उत्स्फूर्त सहभाग हीच ग्रामीण भारताची खरी ओळख आहे. याचा प्रत्यय पुन्हा एकदा सिल्लोड तालुक्यातील पालोद येथे आला. पवित्र रमजान ईदनिमित्त आयोजित स्नेहमिलन सोहळ्यात हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन शुभेच्छांचा वर्षाव केला. या निमित्ताने पालोद ग्रामस्थांनी जात-पात आणि धर्माच्या भिंती ओलांडून 'राष्ट्रीय एकात्मतेचा' एक नवा वस्तुपाठ समाजासमोर ठेवला आहे.

सण कोणताही असो, तो आनंद वाटून घेण्यासाठी असतो, ही भावना पालोदमध्ये प्रत्येक घरात पाहायला मिळाली. ईदच्या मुहूर्तावर रईस पठाण, महेबुब पठाण, अहेजान पठाण, अफ्फा पठाण, सरफराज पठाण, हकीम मिस्त्री, अफसर शहा आदी मुस्लिम बांधवांनी आपल्या हिंदू मित्र आणि शेजाऱ्यांसाठी शिरखुर्म्याची खास मेजवानी आयोजित केली होती. पांढरी शुभ्र टोपी आणि कपाळावरील टिळा जेव्हा एकमेकांना आलिंगन देण्यासाठी सरसावले, तेव्हा संपूर्ण गावात एकोप्याचे वातावरण निर्माण झाले



होते. या स्नेहभेटीतून केवळ गोडव्याची देवाणघेवाण झाली नाही, तर अनेक वर्षांपासून चालत आलेल्या बंधुभावाच्या परंपरेला अधिक बळकटी मिळाली. या सलोखा सोहळ्याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर यांनी विशेष उपस्थिती लावून सर्वांना शुभेच्छा दिल्या. "पालोद गावचा इतिहास हा नेहमीच सामाजिक सौहार्दाचा राहिला आहे. येथील हिंदू-मुस्लिम बांधव एकमेकांच्या सणात हिरिरीने सहभागी होतात. आजच्या या उपक्रमाने आमच्यातील प्रेम आणि जिव्हाळा अधिक वृद्धिंगत केला आहे," असे प्रतिपादन यावेळी पालोदकर यांनी केले. त्यांच्यासोबत प्रफुल्ल हुरणे, सुरेश पालोदकर, गणेश पालोदकर, गोपाल पालोदकर, सचिन पालोदकर, निखिल पालोदकर यांसह गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक आणि दोन्ही समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यजमान मुस्लिम बांधवांनी अत्यंत अगत्यशीलतेने सर्वांचे स्वागत केले. सामाजिक सलोख्याचा हा 'पालोद पॅटर्न' सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरत आहे. ग्रामीण भागातील ही एकजूट येणाऱ्या काळात समाजासाठी दीपस्तंभाचे कार्य करेल, असा विश्वास यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# साठीच्या उंबरठ्यावरही कॉलेजच्या दिवसांची जादू ; 'बीए ८९-९०' बॅचच्या सवंगड्यांनी अनुभवले 'कोकणचे सौंदर्य!'

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी** : डोक्यावरचे पिकलेले केस, अनुभवाचे गाठोडे आणि वयाची साठी जवळ आलेली... पण या साऱ्या पलीकडे जाऊन जेव्हा हे सवंगडी एकत्र आले, तेव्हा वय विसरून गेले. आज वयाने साठीच्या घरात असलेल्या या मित्र-मैत्रिणींनी आपले देहभान हरपून, आयुष्याच्या या वळणावर पुन्हा एकदा बालपण अनुभवले. निमित्त होते स्वामी विवेकानंद कॉलेज पेण येथील 'बीए ८९-९०' मैत्री ग्रुपच्या 'कोकण दर्शन' सहलीचे! २८ वर्षांपूर्वी विखुरलेल्या वाटा जेव्हा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून एकत्र आल्या, तेव्हा त्या मैत्रीचा सुगंध पुन्हा एकदा चोहीकडे दरवळू लागला.

सोशल मीडियाच्या माध्यमातून आठ वर्षांपूर्वी या मैत्रीचे एक इवलेसे रोप लावले गेले होते. आज या रोपट्याचे रूपांतर एका विशाल वटवृक्षात झाले असून, त्याच्या सावलीत



हे सर्व मित्र-मैत्रिणी एकत्र आले आहेत. हा केवळ सहलीचा ग्रुप नाही, तर एकमेकांच्या सुख-दुखात खंबीरपणे उभे राहणारे एक अतूट कुटुंब बनले आहे. गेल्या आठ वर्षांपासून हा ग्रुप वार्षिक स्नेहसंमेलन, पिकनिक आणि विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे.

विशेष कौतुकास्पद आणि मनाला स्पर्शून जाणारी बाब म्हणजे, ग्रुपमधील मित्र-मैत्रिणींच्या पहिल्या विवाह सोहळ्यासाठी या ग्रुपच्या वतीने 'आहेररूपी' मोलाची आर्थिक मदत केली जाते. एवढेच नाही तर, अडीअडचणीत आणि संकटात सापडलेल्या मित्राला आधार देणे किंवा एखाद्या सवंगड्याचे दुःखद निधन झाल्यास त्याच्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे अशा सामाजिक जाणीवेतूनइथून हा ग्रुप आजही कार्यरत आहे २८ वर्षानंतरही जेव्हा हे मित्र एकत्र येतात तेव्हा काळाचे भान हरपून सगळे पुन्हा एकदा कॉलेजच्या कट्ट्यावर असल्यासारखे मनमुराद आनंद लुटतात.

दिनांक २१ आणि २२ मार्च रोजी आयोजित या सहलीत मित्र-मैत्रिणींनी कोकणातील लोटे परशुराम, गणपतीपुळे, प्राचीन कोकण ,पावस, मारलेश्वर अशा निसर्गरम्य आणि धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. कोकणी जेवणाचा आस्वाद घेत मौज मस्ती भेंड्या आणि जुन्या आठवणींना उजाळा देत सर्वांनी धमाल केली. साठीच्या घरात असूनही या मित्र-मैत्रिणींचा उत्साह एखाद्या विशीतल्या तरुणाला लाजवेल असा होता.

सहलीचा शेवट अत्यंत हृदयस्पर्शी आणि भावुक झाला दोन दिवस एकत्र राहिल्यानंतर निरोप घेताना प्रत्येकाचे मन जड झाले होते. आयुष्याच्या संध्याकाळी अशा निस्वार्थ मैत्रीची साथ मिळणे हे भाग्याचे असल्याची भावना प्रत्येकाच्या डोळ्यात दिसत होती. निरोप घेताना आपण पुन्हा भेटू पण तोपर्यंत प्रत्येक जण नीट रहा, स्वतःला जपा असे एकमेकांना बजावताना निरोपाचे क्षण अधिकच जड झाले.

शरीराने आपण दूर जात असलो तरी मनाने आपण याच वटवृक्षाच्या सावलीत आहोत, याभावनेने पुढच्या भेटीच्या ओढीने अस्वस्थ पण तृप्त मनाने या पिकनिकची सांगता झाली. मैत्री असावी तर अशी असा आदर्शच या ८९-९० च्या बॅचने समाजासमोर ठेवला.

# श्रीवर्धनात करिअर मार्गदर्शनाचा अभाव; विद्यार्थ्यांची उदासीनता चिंताजनक

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी : अनिकेत मोहित** : सध्याच्या स्पर्धात्मक युगात करिअर आणि व्यवसाय मार्गदर्शन ही काळाची गरज असताना श्रीवर्धन तालुक्यात मात्र याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित असताना देखील येथील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा, शासकीय सेवा किंवा उच्च पदांसाठी झटण्याची मानसिकता दिसून येत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे.आजच्या घडीला MPSC, UPSC, पोलिस भरती यांसारख्या स्पर्धा परीक्षा तरुणांसाठी सुवर्णसंधी ठरू शकतात. मात्र श्रीवर्धनमधील बहुतांश विद्यार्थी या संधींकडे पाठ फिरवताना दिसत आहेत. ना योग्य मार्गदर्शन, ना तयारीची जिद्द – या दुहेरी संकटामुळे येथील तरुणांचा कल फक्त पारंपरिक किंवा मर्यादित पर्यायांकडेच वळलेला आहे.

शासकीय सेवेत किंवा उच्च पदांवर श्रीवर्धनमधील युवकांची संख्या अत्यंत कमी आहे, ही वस्तुस्थिती समाजासाठी लाजिरवाणी ठरत आहे. इतर शहरांमध्ये विद्यार्थी कठोर परिश्रम करून यश मिळवत असताना श्रीवर्धनमधील तरुण मात्र अजूनही निष्क्रियतेच्या गर्तेत अडकलेले दिसतात.यासाठी केवळ विद्यार्थ्यांनाच दोष देऊन चालणार नाही, तर पालक, शिक्षक आणि स्थानिक प्रशासन यांचीही जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. करिअर मार्गदर्शन शिबिरे, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, प्रेरणादायी उपक्रम यांची तातडीने गरज असून याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही तर भविष्यातील पिढी अंधारात ढकलली जाईल, हे निश्चित.आता तरी श्रीवर्धनमधील विद्यार्थ्यांनी जागे होऊन आपल्या भविष्याचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा "संधी असूनही प्रयत्न नाही" ही ओळख कायमची चिकटण्याचा धोका निर्माण झाला आहे.

# अजितदादांच्या अपघातावर चर्चा टाळली जातेय का?” – अमोल मिटकरींचा निरोपाच्या वेळी संताप; सभागृहात भावनिक उद्गार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका मुंबई** : राज्याच्या राजकारणात आज पुन्हा एकदा भावनिक आणि गंभीर वातावरण निर्माण झाले, जेव्हा आमदार अमोल मिटकरी यांनी सभागृहात बोलताना अजित पवार यांच्या अनुपस्थितीबाबत तीव्र भावना व्यक्त केल्या. “आज माझ्या निरोपाच्या वेळी अजितदादा उपस्थित नाहीत, ही गोष्ट अत्यंत वेदनादायी आहे,” असे सांगताना मिटकरी visibly भावूक झाले.

मिटकरी यांनी सांगितले की, “राजकारणात मला संधी देणारे अजितदादा आहेत, म्हणूनच मी त्यांचा फोटो सोबत आणला. मात्र



आज ते स्वतः उपस्थित नाहीत, ही खंत मनाला लागून राहिली आहे.” त्यांनी सभापतींना विनंती करत फोटोसेशनदरम्यान अजित पवारांसाठी एक खुर्ची राखीव ठेवण्याची मागणी केली.

यावेळी त्यांनी अजित पवार यांच्या अपघात प्रकरणावर सभागृहात चर्चा न होण्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. “महायुती सरकारमध्ये इतक्या मोठ्या नेत्याच्या अपघातावर चर्चा होत नसेल, तर हे अत्यंत गंभीर आहे. अंतिम आठवड्यात तरी या विषयावर चर्चा व्हावी,” अशी मागणी त्यांनी केली.

मिटकरी यांनीअशोक खरात प्रकरणाचाही उल्लेख करत, हा मुद्दा मागे पडू नये असे सांगितले. तसेच व्हीएसआर मालकाशी खरात यांचे संबंध असू शकतात का, याबाबतही शंका उपस्थित केली.

याशिवाय, भिगवण परिसरात अजित पवार यांच्या घराजवळ काळी जादू करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. “अजितदादा अंधश्रद्धा मानत नव्हते, पण त्यांच्या अपघातामागे घातपात आहे का, याची सखोल चौकशी व्हायला हवी,” असेही ते म्हणाले.मिटकरी यांनी सरकारला हात जोडून विनंती करत म्हटले की, “आजच्या कामकाजात चर्चा नाही म्हणजे हा विषय जाणीवपूर्वक वगळला गेला का? जर आज निरोप समारंभ आहे, तर तो रद्द करून अजितदादांच्या अपघातावर चर्चा घ्यावी. किमान उद्या तरी या विषयावर चर्चा व्हावी.”

सभागृहात त्यांनी थेट सवाल उपस्थित केला — “अजितदादा प्रकरणावर चर्चा कुणाला नको आहे का?”या संपूर्ण घडामोडीमुळे राज्याच्या राजकारणात अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाला नव्याने राजकीय वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूटच्या कै.सौ.शालन शिवराम चव्हाण सभागृहात कर्तृत्ववान पुणेकर महिला जनजागृती सेवा संस्थेकडून सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**पुणे प्रतिनिधी/गुरुनाथ तिरपणकर** : विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहर महाराष्ट्रात ओळखल जात, दिनांक 18 मार्च 2026 रोजी , 8 मार्च रोजी साजरा झालेल्या जागतिक महिला दिनाचे निमित्त साधून जनजागृती सेवा संस्था, ठाणे बदलापूर यांच्या वतीने एक अत्यंत देखणा सत्कार समारंभ पुणे येथील रितिका कॉम्प्लेक्स नऱ्हे रोड धायरी फाटा येथील कै. सौ शालन शिवराम चव्हाण सभागृहामध्ये अत्यंत दिमाखामध्ये आणि उत्साहामध्ये पार पडला. याप्रसंगी पुण्यामधील विविध क्षेत्रात आपल्या कर्तुत्ववान कार्याने समाजात मानाचे स्थान निर्माण करणाऱ्या सेवाभावी आणि कर्तुत्व सिद्ध केलेल्या महिलांचा गुणगौरव करून सत्कार करण्यात आला.हा गुणगौरव आणि सत्कार करण्यासाठी पुण्यामधील विविध क्षेत्रात भरारी घेणाऱ्या शैक्षणिक, सांस्कृतिक, उद्योग क्षेत्र, साहित्य, कायदा, कला क्रीडा, वैद्यकीय, सामाजिक विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पुणे स्थित महिलांचा सत्कार करण्यात आला . गौरवांकित सर्व स्त्रियांचा सत्कार करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवर यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉक्टर आम्रपाली मोहिते, व्यसनमुक्ती समुपदेशक, तृतीयपंथीयांसाठी कार्य करणाऱ्या समस्येविका.. एडवोकेट अनिशा फणसळकर ज्येष्ठ विधीज्ञ आणि आमोदिनी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष, प्राध्यापिका डॉक्टर भाग्यश्री जोगदेव, साहित्यिक ,शिक्षणतज्ञ , रेशा अभ्यंकर, मानसोपचार तज्ञ आणि सल्लागार, ज्योती नाळे, संपादिका दैनिक संध्या पुणे, शिवराम चव्हाण, डायरेक्टर-ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट, एडवोकेट सचिन देवांग संस्थापक कोष्टी व्हिजन



ट्रस्ट , श्री रामजीत गुप्ता, मुख्य तपास अधिकारी, अँटी पायरोसी सेल, जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री गुरुनाथ तिरुपणकर सर, संस्थेच्या सचिव सौ संचिता भंडारी, खजिनदार दत्ता कडूलकर, उपाध्यक्ष महेश्वर तेटांबे व अनेक पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने सर्व मान्यवर प्रमुख पाहुण्यांचा देखील सत्कार गुलाब पुष्प, शाल, मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन करण्यात आला. सर्वच मान्यवरांनी महिला दिनाचे औचित्य साधत स्त्रियांमधील क्षमता, स्त्री पुरुष समानतेमधून देखील स्त्रिया करत असलेले उल्लेखनीय कार्य, स्त्रियांचे खरे सक्षमीकरण, आपल्यामधील क्षमता सिद्ध करण्यासाठी कोणावरही अन्याय न करता स्वबळावर कसे पुढे जावे, स्त्रियांनीच स्त्रियांना पुढे जाण्यासाठी कसे प्रवृत्त करावे, स्त्री आणि पुरुष अशा दोन्ही हिंदोळ्यावर जगताना देखील एक पुरुषांमधील स्त्री देखील स्वत:साठी आणि समाजासाठी किती कळकळीने काम करू शकते, अशा विविध विचारांचे आदान प्रदान करत स्त्री खऱ्या अर्थाने अशा सन्मानास कशी पात्र आहे आणि हा गुणगौरव एक दिवसाचा न ठरता तो वर्षभर कसा साजरा करता येईल तसेच स्त्री आणि पुरुष दोघांनी एकमेकांचा आदर करत समाजाला कसे पुढे न्यावे याविषयी भाष्य करत सर्व प्रेक्षकांचे लक्ष खिळवून ठेवले. सर्वच मान्यवरांच्या उद्बोधक अशा विचारांमुळे प्रेक्षागृहातील उपस्थितांचे मन हेलावून गेले. यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. उपस्थित राहिलेल्या सत्कारार्थी स्त्रियांचा सत्कार, सन्मान आणि गुणगौरव प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांना शाल, गुलाबपुष्प, सन्मानचिन्हे आणि सन्मानपत्र तसेच आकर्षक पेन देऊन अत्यंत प्रेमाने करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे सर्वेसर्वा श्री गुरुनाथ तिरपणकर सर आणि त्यांचे पदाधिकारी मुंबईहून खास उपस्थित राहिले होते.संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी संस्थेच्या पाच वर्षातील कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सौ तिरपणकर वहिनी, श्री. शिवराम चव्हाण सर, या सर्वांनी खूपच कष्ट घेतले आणि कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे साजरा केला. कार्यक्रमानंतर उपस्थितानी आवर्जून असा कार्यक्रम घेऊन तो यशस्वी केल्याबद्दल गौरवोद्गार काढले. जनजागृती सेवा संस्थेने पुण्यात घेतलेला हा कार्यक्रम अगदी मनापासून लक्षात राहील असाच होता. अशा दिमाखदार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे भाग्य लाभल्याबद्दल सर्वांनी आपापल्या परीने आभार प्रकट केले. जनजागृती सेवा संस्थेचे हे कार्य निश्चितच अभिमानास्पद आणि कौतुकास पात्र आहे. जनजागृती ही संस्था खऱ्या अर्थाने लोकांमध्ये जनजागृती करण्याचे महान कार्य करीत असून या संस्थेचे कार्य सर्वदूर लोकांपर्यंत पोहोचावे आणि त्यात आपला सहभाग असावा असं प्रत्येकाने सांगून संस्थेस शुभेच्छा दिल्या. जनजागृती संस्थेस मनापासून धन्यवाद आणि संस्थेची कीर्ती लोकोत्तर अशीच वृद्धिंगत होत राहो या सदिच्छा, शुभेच्छा सत्कारमूर्तींनी दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संस्थेच्या सचिव सौ.संचिता भंडारी यांनी केले व आभार संस्थेचे उपाध्यक्ष महेश्वर तेटांबे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामजित(जितु) गुप्ता, संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर,रहुनाथ ढोक, शिवराम चव्हाण, ॲड.अनिशा फणसळकर, यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पर्यावरण असंतुलनामुळे द्रोणागिरी डोंगराला धोका

## संरक्षणासाठी ठोस पावले उचला; आमदार महेश बालदी यांची लक्षवेधी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** उरणमधील ऐतिहासिक आणि पर्यावरणीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या द्रोणागिरी डोंगराच्या संरक्षणाचा मुद्दा आता राज्य विधिमंडळाच्या व्यासपीठावर पोहोचला आहे. स्थानिक आमदार महेश बालदी यांनी विधानसभेत या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडून डोंगराच्या जतनासाठी तातडीने ठोस पावले उचलण्याची मागणी सरकारकडे केली आहे.

विधानसभेत बोलताना आमदार बालदी यांनी, रामायणापासून उल्लेख असलेला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्याचा वारसा लाभलेला द्रोणागिरी डोंगर उरणकरांच्या अस्मितेचा आणि श्रद्धेचा भाग असल्याचे नमूद केले. तसेच गेल्या काही वर्षांपासून या डोंगरावर मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड, धूप आणि अवैध उत्खनन यामुळे पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले असल्याची चिंता व्यक्त केली. अरवली पर्वताच्या धर्तीवर, १०० मीटरपेक्षा जास्त उंची असलेल्या डोंगराळ भागावर कोणत्याही प्रकारच्या डेव्हलपमेंटला परवानगी देऊ नये, हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय द्रोणागिरीसाठीही लागू करावा. द्रोणागिरी डोंगराचा परिसर आयडेंटिफाय फॉरेस्ट म्हणून घोषित करून त्याचे संरक्षण करावे. डोंगरावरील अवैध उत्खनन आणि वृक्षतोड थांबवण्यासाठी शासनाने कठोर धोरण आखावे. असे महत्त्वाचे मुद्दे त्यांनी लक्षवेधी सूचनेतून उपस्थित केले

**पर्वत परिसरांमध्ये होणाऱ्या विकासकामांबाबत नियमांप्रमाणे काम होणार !**

राज्यातील ऐतिहासिक महत्त्व असलेल्या पर्वत परिसरामध्ये होणाऱ्या विकासकामांबाबत शासन गंभीर आहे.

अशा ठिकाणांच्या जतनासोबतच स्थानिक नागरिकांच्या भावनांचा आदर राखत शासनाच्या नियमांप्रमाणेच पुढील कार्यवाही केली जाईल, असे वनमंत्री गणेश नाईक यानी विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देताना स्पष्ट केले. मंत्री गणेश नाईक म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील उरण, मौजे चाणजे येथील द्रोणागिरी पर्वत भागाला ऐतिहासिक महत्व आहे. त्या ठिकाणाला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

त्यामुळे अशा भागांमध्ये विकासकाम करताना नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. केंद्र सरकार तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार १०० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या डोंगरांवर कोणतीही व्यावसायिक, निवासी किवा इतर विकासकामे करण्यापूर्वी सखोल तपासणी केली जाते, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# साताऱ्यात लोकशाहीची हत्या; पोलिसांनी अडवले, आमदारांना ताब्यात घेतलं – शंभूराज देसाई यांचा गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : सातारा जिल्ह्यातील अलीकडील राजकीय घडामोडींवरून मंत्री शंभूराज देसाई यांनी गंभीर आरोप करत मोठा राजकीय वाद निर्माण केला आहे. माध्यमांशी संवाद साधताना देसाई यांनी निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोलिसांकडून अन्यायकारक वागणूक मिळाल्याचा आरोप केला, तसेच विरोधकांकडून सदस्य फोडाफोडी झाल्याचेही स्पष्ट केले.

देसाई म्हणाले की, "त्या निवडणुकीतील सर्व घडामोडी माध्यमांनी पाहिलेल्या आहेत. आमच्याकडे ३७ सदस्य होते. शिवसेना चिन्हावर निवडून आलेल्या दोन सदस्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आणि त्यांना फोडण्यात आले. उर्वरित सदस्य आम्ही एकत्र आणले." त्यांनी पुढे सांगितले की, काहींनी वडिलांचे अपहरण झाल्याची खोटी तक्रार दाखल करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला.

मतदान प्रक्रियेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "मतदान कक्ष अवघ्या १० मीटर अंतरावर असताना आम्हाला पोलिसांनी अडवलं. आम्ही मतदानासाठी जात आहोत, हे सांगूनही आम्हाला ताब्यात घेतलं. आमच्यासोबत दोन मंत्री, एक आमदार आणि एक खासदार असतानाही पोलिसांनी झटापट केली," असा आरोप त्यांनी केला.

याशिवाय, महेश शिंदे यांच्यावरही त्यांनी टीका केली. "महेश शिंदे यांच्या पत्नी भाजपच्या तिकिटावर निवडून आल्या, मात्र शिवसेनेच्या चिन्हावर निवडून आलेल्या दोन सदस्यांना त्यांनी सोबत नेलं," असे देसाई म्हणाले. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, "ज्यांनी व्हीपचे उल्लंघन केले आहे, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल."साताऱ्यातील परिस्थितीवर भाष्य करताना देसाई म्हणाले, "सातारा हा सुसंस्कृत जिल्हा आहे, मात्र येथे राजकीय विरोधातून फोडाफोडी करण्यात आली. मी पालकमंत्री असताना मला धक्काबुक्की झाली, आणि साताऱ्याचे एसपी घरगड्यासारखे वागले." या प्रकरणातील नाराजी कॅबिनेट बैठकीत मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

देसाई यांनी इशारा दिला की, "आम्ही सध्या मुंबईत आहोत, मात्र साताऱ्यात गेल्यावर लोकांचा उद्रेक पाहायला मिळेल." त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित करत, "समोरून पोलिसांची ताकद दिसली. दोन हात करायचे असते तर आमचे कार्यकर्तेही तयार होते," असे वक्तव्य केले.दरम्यान, समन्वय समितीच्या बैठकीबाबत ते म्हणाले की, "बावणकुळे सांगतील तेव्हा बैठक होईल, त्यात हा विषय मांडला जाईल." 'खरात फोटो' प्रकरणावर बोलताना त्यांनी सांगितले की, "अनेक जण फोटो काढतात, मात्र त्यामागची पार्श्वभूमी सर्वांना माहिती असतेच असे नाही."या सर्व आरोपांमुळे साताऱ्यातील राजकारण तापण्याची चिन्हे दिसत असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणावरून राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

# जातियवादी परीचय मेळावे घेण्यापेक्षा, विचार मंथन परीषद घेऊन भारतीय समाज व्यवस्था मजबूत केली पाहिजे - ॲड वामनराव चटप साहेब

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका -** ग्राम स्वराज्य महामंच च्या वतीने यवतमाळ येथे प्रथमच " विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा " चे आयोजन मा मधुसूदन कोवे गुरुजी, अध्यक्ष ग्राम स्वराज्य महामंच यांनी केले होते* *या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष मा वामनराव सिडाम साहेब जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, अखिल भारतीय आदिवासी विकास परीषद नई दिल्ली हे होते तर उद्घाटक म्हणून मा श्रीमती आशाताई काळे संचालिका ग्राम स्वराज्य महामंच ह्या होत्या कार्यक्रमाचे विशेष अतिथी आणि मुख्य मार्गदर्शक म्हणून मा ॲड वामनराव चटप साहेब माजी आमदार राजुरा विधानसभा क्षेत्र मा डॉ प्राचार्य पृथ्वीराज जी राजपूत अमरावती मा डॉ प्रशांत विघे साहेब, सिनेट सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती डॉ पद्मा ताई राजपूत अमरावती आणि स्वागताध्यक्ष म्हणून मा मधुसूदन कोवे गुरुजी होते* *कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मा मधुसूदन कोवे गुरुजी यांनी



विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा या संदर्भात प्रस्तावना मांडली आणि यवतमाळ मध्ये पहिल्यांदा " विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा" आयोजित केला आणि यशस्वी संपन्न झाला यावेळी सर्व सहभागी लोकांचा प्रतिसाद मिळाला याचा आनंद झाला असून आम्ही आपणास खुला मंच उभा करुन दिला म्हणून आपण बहुसंख्येने या परीषद मध्ये सहभागी झाले या कार्यक्रमाचे उद्घाटन समाज गौरव पुरस्कार देवुन खरे लाभार्थी मा डॉ विलास कनाके ठरले हे विचारवंत परीषद मध्ये एक वैशिष्ट्य ठरले होते* *या विचारवंत परीषद मध्ये माजी आमदार ॲड वामनराव जी चटप साहेब यांनी संपूर्ण भरुन असलेल्या सभागृहात आयोजकांचे कौतुक करत असताना म्हणाले की आजकाल जातियवादी परीचय मेळावे भरपूर होत असतात परंतु " विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा " मी पहिल्यांदा पाहतोय याचा आनंद झाला समाज द्वेष निर्माण होवू नये जातियवादी विचार मनात निर्माण होवू नये आणि भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाही मजबूत करण्यासाठी आज तरी सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक, विचारांचे विचार मंथन झाले पाहिजे म्हणून ही विचारवंत परीषद असावी असे स्पष्ट मत ॲड वामनराव जी चटप साहेब यांनी व्यक्त केले* *डॉ प्राचार्य पृथ्वीराज जी राजपूत अमरावती यांनी सुद्धा आपल्या मार्गदर्शनातुन सहभागी साहित्यिक अभ्यासक यांना विशेष महत्त्व पुर्ण सुचना दिल्या आणि समाज गौरव पुरस्कार साठी समिक्षक म्हणून भुमिका पार पाडली* *मा डॉ प्रशांत विघे साहेब, सिनेट सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी सुद्धा भारतीय लोकशाही महिला सक्षमीकरण, सामाजिक आणि राजकीय, आणि सांस्कृतिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी आपण सदैव एकत्र येऊन काम करु असे अनेक प्रसंग विचारवंत परीषद मध्ये मांडले* *सामाजिक क्षेत्रात आयुष्यभर कार्य करणारे मा लक्ष्मण भिवनकर ( कोलाम समाज ) नेते मा अंबादास सलामे गोंडीधर्माचार्यर्य मा वसंतराव कनाके, मा जिवन कोवे मा विशाखा यवतकर, मा प्रांजली तुराणकर मा गिता मेश्राम , मा मनिषा कांबळे या लोकांना " समाज गौरव पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले* *या विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा मध्ये सहभागी डॉ विलास कनाके, प्रिया डाखोडे, संगिता नागदिवे, संतोष इन्सकर, कीशोर इंगळे, राजु चांदेकर, मनिषा काटे, प्रतिभा खसाळे स्वाती बावने, मालती गावंडे, मिना वाघ, बंडू पंधरे मनिराम छाहगड कृष्णा भोंगाडे प्रेमा पत्रिवार तपस्वी ताडाम शायर शाबाद प्रा मेश्राम बाभुळगाव अनेक सहभागी सदस्य मंडळी सन्मान पत्र देण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवेंद्र सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा मोहण जी वडतकर उपाध्यक्ष ग्राम स्वराज्य महामंच यांनी माणले समस्त लोकांनी सार्वजनिक जेवणाचा आस्वाद घेवून कार्यक्रमाची सांगता केली.

# पालेश्वरी चषक 2026 नाईट क्रिकेट स्पर्धेची जल्लोषात सांगता; कोपरा संघ विजेता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** तळोजा एमआयडीसी परिसरातील प्रतिष्ठित पालेश्वरी चषक ,२०२६ नाईट क्रिकेट स्पर्धेचा समारोप उत्साहपूर्ण आणि जल्लोषमय वातावरणात पार पडला. क्रिकेटप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत झालेल्या अंतिम सामन्याने स्पर्धेला रंगतदार शेवट मिळाला. या स्पर्धेत कोपरा संघाने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. तळोजा परिसरातील दोन संघांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान मिळवले. खेरणे संघाने चतुर्थ स्थान पटकावले, चिखली संघ पाचव्या क्रमांकावर राहिला, तर ४० प्लस संघाने सहावा क्रमांक मिळवला.

स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज आणि क्षेत्ररक्षकांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. सायकल व मोटरसायकल यांसारख्या पारितोषिकांमुळे खेळाडूंमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.उत्कृष्ट फलंदाजाचा मानकरी शनी कृपा क्रिकेट संघाचा नीरज ठाकूर ठरला. यावेळी मनोगत व्यक्त करताना त्यांनी सर्व पाठीराख्यांचे आभार मानले. तसेच, "एका संघावर टाकलेली जबाबदारी, संघाचे स्पॉन्सर बंटी ठाकूर, कर्णधार दुर्गेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली





११ खेळाडूंवर ठेवलेला विश्वास आणि त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी—या सगळ्यांना विश्वासात घेऊनच आम्ही खेळलो, त्यामुळे या पर्वाचा शेवट इतका गोड झाला," असे त्यांनी सांगितले.

पालेश्वरी चषकाच्या आयोजनाबाबत बोलायचे झाल्यास, 'एक गाव – एक टूर्नामेंट' ही संकल्पना यशस्वीपणे राबवणारे पालेश्वरी गाव विशेष ठरले. राजकारण बाजूला ठेवून एकजुटीने काम करणाऱ्या ग्रामस्थांमुळे ही स्पर्धा अधिक भव्य आणि यशस्वी झाली. स्पर्धेचे आयोजक हेमराज म्हात्रे यांनी सर्व विजेत्या संघांचे अभिनंदन करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नियोजनबद्ध आयोजनामुळे स्पर्धा सुरळीत पार पडली. एकूणच, पालेश्वरी चषक 2026 हा क्रिकेटप्रेमींसाठी एक अविस्मरणीय आणि प्रेरणादायी क्रिकेट महासंग्राम ठरला.

# सांगवी पाटण येथे रमजान ईदनिमित्त सर्वधर्मसमभावाचा आदर्श

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे रमजान ईदच्या निमित्ताने सामाजिक ऐक्य व भाईचाऱ्याचा आदर्शवत संदेश देणारा कार्यक्रम उत्साहात पार पडला. येथील शिवरायांचा मुस्लिम समीर बादशहा शेख यांच्या निवासस्थानी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ईद साजरी करण्यात आली.

या प्रसंगी आ. सुरेश



धस भागवताचार्य ह.भ.प. काशिनाथ महाराज शास्त्री, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय गोल्हार, प्राचार्य एच. जी. विधाते, युवा नेते अमोल तरटे, सरपंच दत्तात्रय खोटे, माऊली भोसले, राजू भोसले, पत्रकार नितीन कांबळे, संतोष ससाणे, ग्रामविस्तार अधिकारी, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी एकमेकांना गळाभेट देत रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमातून सांगवी पाटण गावात जपली जाणारी भाईचारा आणि सर्वधर्मसमभावाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली.विशेष म्हणजे, सांगवी पाटण येथील ग्रामस्थ रमजान ईद, दीपावली, दसरा, यात्रा, पोळा यांसारखे सर्व सण एकत्रितपणे साजरे करतात. त्यामुळे गावात सामाजिक सलोखा आणि ऐक्याची भावना अधिक दृढ होत आहे.

"आपण कोणत्या जाती-धर्मात जन्माला येतो हे आपल्या हातात नसते, मात्र सर्व जाती-धर्मांचा आदर करणे हे आपल्या हातात असते," हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.सांगवी पाटणची ही परंपरा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, आजच्या काळात अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

सिद्धी प्रिंटर्स

दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.

वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये डीटीपी करून मिळेल

Call 9028240020 ,9220403509

# खुलेआम भोंदूगिरी करणाऱ्या बाबांची यादी अंनिस पोलिसांना देणार - राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते यांना अंनिसचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : ज्योतिषी- बाबा-बुवा आणि राजकारणी-सरकारी अधिकारी-धनदांडग्या प्रभावशाली व्यक्ती यांची साठगाठ किती भयानक शोषणकारी असते याचे हादरवून टाकणारे चित्र ज्योतिषी अशोक खरातच्या प्रकरणातून पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या समोर आले आहे.

या प्रकरणाचा निःपक्षपाती तपास होऊन गुन्हेगारांना शासन झालेच पाहिजे तसेच पुन्हा असे प्रकार घडू नयेत यासाठी पुढील मुद्द्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**भोंदूबाबांची यादी**

सामान्य नागरिक व पीडित व्यक्ती या बुवा बाबांकडून होणाऱ्या शोषणासंदर्भात अंनिस कार्यकर्त्यांशी संपर्क साधत असतात. प्रत्येक जिल्ह्यातील अशा प्रमुख शोषणकारी भोंदू बुवाबाबांची यादी व शक्य असेल तेथे यासंदर्भातील पुरावे असलेला पेन ड्राईव्ह अंनिसचे कार्यकर्ते जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या सुपूर्त करणार आहेत.

अंनिसच्या राज्य कार्यकारी समितीचे सदस्य मुक्ता दाभोलकर, राजीव देशपांडे, गणेश चिंचोले यांनी आज दिनांक 23 मार्च रोजी महाराष्ट्राचे पोलिस महासंचालक श्री सदानंद दाते यांची भेट घेऊन त्यांना यासंदर्भातील निवेदन दिले. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाची स्थापना करण्याचा शासन निर्णय आहे. हे अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष प्रत्यक्ष कार्यान्वित करणे आवश्यक आहे. पत्रकार, महिला, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांना सदर अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाचे सदस्य म्हणून जोडून घेऊन त्यांच्या नियमित बैठका झाल्या तर परिसरात चालणारे अघोरी प्रकार वेळीच समोर येतील व त्यांना पायाबंद घालता येईल. त्यासाठी फक्त कागदावर असलेले हे अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष कार्यान्वित झाले पाहिजेत अशी मागणी या निवेदनामध्ये करण्यात आलेली आहे. मा. पोलिस महासंचालक सदानंद दाते यांच्या भेटीदरम्यान याबद्दलचे निवेदन देखील त्यांना देण्यात आले.



भोंदूबाबांसंदर्भात हेल्पलाईन भोंदूबाबा, ज्योतिषी यांनी शोषण केलेल्या पीडित व्यक्तींसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती एक हेल्पलाइन सुरू करत आहे. त्याचे मोबाईल क्रमांक पुढीलप्रमाणे.

7588806688

8087876809

ज्योतिषी, भोंदूबाबा महिलांचे शोषण करत असल्यास हेल्पलाईन क्रमांक

9422305929 यावर संपर्क करावा. याद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींचे तथ्य तपासून अंनिस वेळोवेळी त्यांची यादी पोलिसांना देणार आहे.

**जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम तयार करण्याची मागणी**

डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या बलिदानानंतर 2013 साली जादूटोणा विरोधी कायदा मंजूर झाला. याला एक तप उलटून गेले तरीही शासनाने या कायद्याचे नियम तयार केलेले नाहीत. जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम तयार करून सदर कायद्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया आणि त्यासंदर्भातील पोलिसांची जबाबदारी शासनाने अधिक सुस्पष्ट केली पाहिजे. लोकांच्या मनात भीती उत्पन्न करून त्यांना अघोरी कृत्ये करायला लावणारे अशोक खरात सारखे ज्योतिषी, बाबा, बुवा, मांत्रिक गावोगावी आहेत. ते अशोक खरात एवढे दांडगे बनण्याची वाट न पाहता वेळीच पोलिस हस्तक्षेप करून त्यांच्या प्रभावाला पायबंद घालण्यासाठी या कायद्याचे नियम तयार झालेच पाहिजेत. सदर नियमांचा प्रस्तावित मसुदा महाराष्ट्र अंनिसने याआधी शासनाला सादर केलेला होता परंतु लवकरच पुन्हा एकदा अंनिसच्या वतीने या नियमांचा मसुदा सामाजिक न्याय विभागाला सादर करण्यात येईल.

**सोशल मीडियातून होणाऱ्या अंधश्रद्धा प्रसाराला अटकाव**

सोशल मीडियातून बाबा- बुवा, ज्योतिषी, मंत्र-तंत्र यांच्या रील्सचा लोकांवर अक्षरशः भडिमार होत आहे. औरंगाबाद खंडपीठाच्या या संदर्भातील निर्णयाला अनुसरून शासनाने अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींचे नियमन करणारी स्वतंत्र यंत्रणा तातडीने तयार करायला हवी अशी मागणी या प्रेसनोटमध्ये करण्यात आली आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने या सर्व मागण्यांची मांडणी करणारे पत्र माननीय मुख्यमंत्र्यांना देखील पाठवण्यात येणार आहे अशी माहिती महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्यकारी समिती सदस्य नंदिनी जाधव, मुक्ता दाभोलकर, नीता सामंत, मिलिंद देशमुख, राहुल थोरात, हमीद दाभोलकर, राजीव देशपांडे, फारुख गवंडी यांच्या वतीने देण्यात आली. खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अनिसचे कार्यकर्ते कडून महाराष्ट्र पोलीस महासंचालक श्री सदानंद दाते यांना निवेदन देण्यात आले

# रिसोड येथे "जागतिक हवामान दिन" कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी रणजीत ठाकूर** : मनुष्याच्या बाबतीत अन्न पाण्याविना कोण किती दिवस जगेल हे ज्याच्या-त्याच्या शारिरीक क्षमतेवर अवलंबून आहे,पण हवे शिवाय तो 5 मिनीट सुध्दा जगू शकत नाही हे त्रिकालबाधित सत्य आहे. म्हणून हा अत्याआवश्यक नैसर्गिक घटक लक्षात घेऊन त्याबद्दल चिंतन होण्याच्या दृष्टिकोनातून जागतिक पातळीवर 23 मार्च 1950 रोजी जिनेव्हा येथे जागतिक हवामान संघटनेची स्थापना झाली.ज्यामध्ये आजरोजी 191 देश कार्यरत आहेत.उपर्युक्त विश्लेषण "जागतिक हवामान दिन" कार्यक्रमाचे आयोजक गजानन मुलगे ह्यांनी महात्मा ज्योतिबा फूले विद्यालय रिसोड येथे केले.कार्यक्रमाकरिता अध्यक्ष म्हणून





विठ्ठल सारोळकर,तर प्रमुख अतिथी म्हणून आदर्श पर्यावरण शिक्षक विठ्ठल सरनाईक प्रामुख्याने उपस्थित होते.कोरोना कालखंडाची आठवण करून देत सरनाईक ह्यांनी मानवी जीवनामध्ये ऑक्सिजनचे महत्व पटवून दिले.आधुनिक तंत्रज्ञान आणि सदर्हु तंत्रज्ञानाच्या विकास कामामुळे हवेच्या गुणवत्तेमध्ये दिवसागणिक घट होत आहे.आजपासून 50 वर्षापुर्वी शेकडा 80 टक्के शेतकरी पौष्टिक आणि रवेदार बिन पाण्याच्या गव्हाचे उत्पन्न घेत असतं.सद्धस्थितीत शेतातील गव्हाच्या पिकाचे कमीत-कमी पाच वेळा सिंचन केल्याशिवाय पिक घरात येत नाही. गव्हाप्रमाणे इतर धान्य आणि चटकदार फळ-फळावळांचे उत्पन्न सुद्धा केवळ तत्कालीन हवेच्या गुणवत्तेमुळे होत असे.आजही सागवान,धावंडा,चंदन, देवबाभूळ तसेचं 20 ते 25 फूट उंच कॉंक्रीटच्या भिंतीवर रखरखत्या उन्हात हिरवाकंच दिसणारा पिंपळ किंवा वटवृक्ष सुध्दा हवेच्या गुणवत्तेवरचं टिकून आहेत ह्यामध्ये तिळमात्र शंका नाही.विकास कामे तर आपण थांबवू शकत नाही पण नको तो अनावश्यक विकास किंवा मानवी मनावर संयम राखत वस्तू खरेदीवर मर्यादा ठेवून वातावरणातील वाढते प्रदूषण कमी करू शकतो हे तेवढेच खरे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विठ्ठल राठोड,बबनराव घाटे, प्रमिला निसांडे,स्वनिल गवई ,मारोती काळे,सारंगधर सानप व उपस्थित विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# कांता फाउंडेशन तर्फे भव्य रक्तदान व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका**

**नागपुर:-** कांता फाउंडेशनच्या वतीने समाजहिताचा उपक्रम म्हणून भव्य रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमात मोठ्या संख्येने युवक-युवती तसेच नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये अनुभवी डॉक्टरांच्या टीमकडून विविध आजारांची तपासणी करण्यात आली व आवश्यक त्या औषधांचेही मोफत वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन श्री विनय मामीडवार, श्री प्रशांत गभने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी कांता फाउंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक करत, अशा समाजोपयोगी





कार्यांमुळे जनजागृती व आरोग्याबाबतची जागरूकता वाढते असे मत व्यक्त केले.

कांता फाउंडेशनचे पदाधिकारी सचिव महेश मामीडवार यांनी सांगितले की, भविष्यातही अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवले जाणार आहेत.या यशस्वी आयोजनासाठी फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

## प्रेक्षकांची प्रतिक्षा संपवून मुंबई येथील भारतमाता सिनेमा नवीन रूपात रसिक प्रेक्षकांच्या सेवेत आज पासून सज्ज होणार

**दैनिक युवक आधार**

**उमकांत पानसरे :** कोविड काळात मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणावर नूतनीकरणासाठी काम सुरू असणारे लालबागचा राजाच्या कृपेने येथे जवळच असणाऱ्या ' भारतमाता सिनेमा ' या थिएटर चे बांधकाम पूर्ण झाले असून आवश्यक असणाऱ्या विविध परवाने अन्य कायदेशीर कागदपत्र पूर्ण करण्यात विविध अडचणींचा सामना करत सुमारे सहा वर्षानंतर रसिक प्रेक्षकांच्या प्रेमापोटी मंगळवारी 24 मार्च 2026 रोजी सायंकाळी साडेपाच वाजता पुन्हा एकदा नवीन रूपात रसिकांच्या प्रेक्षकांच्या सेवेत येणार असून ' मराठी चित्रपटांसाठी ' प्रसिद्ध असणाऱ्या भारतमाता या सिनेमा हॉलच्या स्वागतासाठी प्रेक्षकही आतुर होऊन वाट पाहत होते आणि आज ती प्रतिक्षा





संपून प्रेक्षकांच्या सेवेत पुन्हा एकदा नवीन जोषात विविध मराठी सिनेमांचा आनंद या निमित्ताने रसिक प्रेक्षकांना घेता येईल सिनेमाा हॉलचे नवीन रूप प्रेक्षकांना सुखावून जाईल असे भारतमाता सिनेमा चे मॅनेजर श्री सत्यवान पाटील यांनी ' दैनिक युवक आधार ' वृत्तपत्राशी बोलताना सांगितले.

# अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा - राहुल राठोड

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : बंजारा समाजासह वंचित उपेक्षित शेतकरी ऊसतोड कामगार बांधवांची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पोहरागड येथे दिनांक २५ मार्च बुधवार रोजी बंजारा ब्रिगेड च्या वतीने अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्या चे आयोजन सर्व संत महंतांच्या व बंजारा समाजातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत करण्यात आलेले आहे. या मेळाव्याला समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बंजारा ब्रिगेड चे प्रदेशाध्यक्ष राहुल भाऊ राठोड यांनी केले आहे.



अखिल भारतीय बंजारा मेळाव्याला आमदार धर्मगुरू बाबूसिंगजी महाराज, धर्मगुरू महंत कबीरदास महाराज, धर्मगुरू महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत रमेश महाराज, महंत खुशाल महाराज,महंत प्रकाश महाराज यांच्यासह भारतभरातून येणाऱ्या प्रमुख बंजारा नेत्यांची उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्याला बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड मार्गदर्शन करणार असून मागील अनेक वर्षापासून देशपातळीवर आरक्षण, शिक्षण, हालाकीची आर्थिक परिस्थिती, सामाजिक मागासलेपण, तांड्यावर आत्तापर्यंत न झालेला विकास अश्या अनेक समस्यांना बंजारा समाज तोंड देत आला असून त्याकडे शासन प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच महाराष्ट्रासह देशपातळीवर सामाजिक एकजुटीचा निर्णय घेण्याची वेळ आली असल्याने भारतातील २० कोटी बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरागड येथे अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी भारतभरातून महाराष्ट्रासह १३ ते १४ राज्यातील बंजारा बांधवांची उपस्थिती राहणार आहे या अभूतपूर्व ऐतिहासिक मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी बंजारा भटक्या विमुक्त समाजातील समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवहान बंजारा ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष राहुल राठोड यांनी केले आहे.

# विजय खाजेकर यांच्या संकल्पनेतून सिल्लोड आगाराची 'एआय' भरारी

## 'लालपरी'तून घुमणार तंत्रज्ञानाचा हुंकार ; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** बदलत्या काळानुसार माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती होत असून, आता शेतीपासून ते उद्योगांपर्यंत सर्वच स्तरावर 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) चा वापर अनिवार्य झाला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या जागतिक स्पर्धेत मागे राहू नये, या उदात्त हेतूने सिल्लोड परिसरात महाराष्ट्र ज्ञान महामंडळामार्फत (MKCL) एक अनोखा उपक्रम राबविला जात आहे. 'लालपरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसच्या माध्यमातून आता गावागावांत 'एआय' शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला जाणार आहे.सध्याच्या युगात कमी वेळेत अचूक ज्ञान मिळवणे, नवनवीन प्रोजेक्ट्स तयार करणे आणि संशोधनासाठी 'एआय'





> **"ग्रामीण भागातील शेवटच्या घटकाला आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी आणि त्यांच्यामध्ये शैक्षणिक विकास व्हावा, हाच आमचा मुख्य उद्देश आहे. लालपरी ही ग्रामीण भागाची जीवनवाहिनी असल्याने तिच्या माध्यमातून दिलेला संदेश प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचत आहे."**
>
> **— विजय खाजेकर (संचालक, एमएससीआयटी केंद्र, सिल्लोड)**

टूल्स अत्यंत प्रभावी ठरत आहेत. याच पार्श्वभूमीवर, अधिकृत एमएससीआयटी (MS-CIT) केंद्रांच्या माध्यमातून आता विद्यार्थ्यांना पारंपारिक संगणक साक्षरतेसोबतच आधुनिक 'एआय' तंत्रज्ञानाचे विशेष प्रशिक्षण दिले जात आहे.

तालुक्यातील दुर्गम भागातील विद्यार्थी, महिला, छोटे व्यावसायिक आणि प्रगतशील शेतकऱ्यांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचावे, यासाठी एसटी बसवर आकर्षक माहिती फलक लावण्यात आले आहेत. नाशिक, सिल्लोड, पाचोरा, येवला, सोयगाव, वैजापूर यांसारख्या विविध मार्गांवर धावणाऱ्या बसेसवर हे फलक झळकणार आहेत. यामुळे प्रवासादरम्यान नागरिकांमध्ये तंत्रज्ञानाविषयी कुतूहल निर्माण होऊन शैक्षणिक जनजागृती होण्यास मदत होत आहे.या नाविन्यपूर्ण मोहिमेच्या प्रारंभी एसटी महामंडळाचे सहाय्यक वाहतूक अधीक्षक श्री. विजय कळवणे, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विकास चव्हाण, वाहतूक निरीक्षक हरी शेळके, किरण शेळके यांच्यासह चालक-वाहक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच एमएससीआयटी केंद्रांचे संचालक विजय खाजेकर, सचिन उपळीकर, अस्लम सय्यद, मनोज पांढरे, आनंद उघडे यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला आहे.

# कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी आयोजित मोफत वधू-वर परिचय मेळावा संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :(दत्ता खंदारे / प्रतिनिधी ) :** कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांच्या वतीने सायन येथील डि. एस हायस्कूल मध्ये मोफत वधू -वर परिचय मेळावा दिनांक २१ मार्च २०२६ रोजी आयोजित केला होता. यावेळी सौ अर्चनाताई शिंदे (नगरसेविका ), श्री ना. म शिंदे (जेष्ठ साहित्यिक ), शिवलिंग व्हटकर (अध्यक्ष संत कक्कय्या समाज विकास संस्था धारावी ), राम कोकणे (अध्यक्ष समस्त कक्कय्या समाज महासंघ मुंबई ), महादेव शिंदे (अध्यक्ष वीर शैव कक्कय्या कल्याण मंडळ ),सौ. कांता तपासे (अध्यक्ष डोंबिवली मंडळ ),अशोक पाटेकर (सचिव वीर शैव कल्याण समाज मंडळ वेरूळ ), संदीप कळंबे (निवृत्त उपजिल्हाअधिकारी मुंबई ), शशिकांत सोनवणे(प्रवक्ता समस्त कक्कय्या समाज महासंघ )यांच्या उपस्थित





हा वधू -वर परिचय मेळावा उदंड प्रतिसादात संपन्न झाला. यावेळी समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

वधू -वरांना एकाच व्यासपीठावर आणून त्याच्या अपेक्षा काय आहेत याची माहिती मिळते.शिवाय लग्न जुळवतना वधू आणि वरांच्या घरच्या मंडळींना वधू वरांच्या अपेक्षा काय आहेत याची माहिती अगोदरच कळल्यामुळे कुठलीच अडचण निर्माण होत नाही.भावी वधूवर निवडतांना जास्त अपेक्षा करणे व्यर्थ. त्यापेक्षा माणसं कशी आहेत, हेच पाहणे महत्त्वाचे. वाढत्या कौटुंबिक गरजा, त्या पूर्ण करण्याच्या अनुषंगाने ताणतणाव कौटुंबिक दुराव्यामुळे वधूवर पालक परिचय मेळावा ठिकठिकाणी आयोजित होणे आता आवश्यक बाब बनली आहे. त्यामुळे कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांनी पुढाकार घेऊन संत कक्कय्या समाजाचा वधू-वर परिचय मेळावा यशस्वीरित्या पार पाडला. यावेळी ३००हून अधिक नवोदित वधू वरांनी आपली नाव नोंदणी करुन आपला परिचय दिला.

कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांनी आयोजित केलेल्या या वधू वर परिचय मेळाव्यासाठी मुख्य मार्गदर्शक विजय पोळ,कार्याध्यक्ष मनोहर सोनवणे,अध्यक्ष हेमंत व्हटकर, सचिव मसाजी होटकर,उपाध्यक्ष गिरीराज शेरखाने, उप सचिव मंगेश खरटमल,अ. हि.तपासणीस परशुराम खंदारे,उपाध्यक्ष विश्वनाथ शिंदे,उपाध्यक्ष किरण व्हटकर, खजिनदार विजय शिंदे उपखजिनदार बाबुराव कावळे,वित्तीय सल्लगार सुनिल पोळ, तसेच मंडळाचे सदस्य गौतम व्हटकर, मच्छिंद्र कदम, वामन पोळ, सुनिल व्हटकर,गंगा जोगधनकर, सुनिता सोनटक्के,माधुरी गायकवाड, सुरेखा व्हटकर, अनुष्का शिंदे, संगिता होटकर, लक्ष्मी पोळ,प्रमिला सोनावणे इत्यादी सभासदांनी विशेष मेहनत घेऊन वधू वर परिचय मेळावा पार पाडला. यावेळी समाजातील विविध मान्यवर मंडळींनी उपस्थित राहून कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांच्या कार्याचा गौरव केला.

# सरकारच्या आश्वासनानंतर सफाई कामगारांचा आझाद मैदानात जल्लोष




**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या मालकी हक्काच्या घरांच्या मागणीसाठी म्युनिसिपल मजदूर युनियनने पुकारलेले 'वर्षा' निवासस्थानावरील आंदोलन यशस्वी झाले व सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर सफाई कामगारांचा जल्लोष आझाद मैदानात पाहायला मिळाला.

म्युनिसिपल मजदुर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली हजारो सफाई कामगार आपल्या कुटुंबासह मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी धडकले होते. यावेळी झालेल्या चर्चेत सरकारने सफाई कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर लवकरच ठोस निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. शासन निर्णयाची (GR) प्रभावी अंमलबजावणी करून कामगारांना न्याय दिला जाईल, असे संकेत दिले.

अशोक जाधव यांनी स्पष्ट केले की, "आम्ही सरकारवर विश्वास ठेवून तूर्तास आंदोलन स्थगित करत आहोत. मात्र सरकारने दिलेल्या शब्दाला सरकार जर जागले नाही तर अधिक उग्र आंदोलन छेडले जाईल. असा इशारा जाधव यांनी दिला.

# राज्यात ग्रामपंचायत पोट निवडणुका जाहीर !

## रायगडात थेट सरपंच रिक्त जागा-30, तर सदस्यांच्या 170 रिक्तजागांसाठी निवडणूक

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ग्रामपंचायती मधील सदस्य, थेट निवडून आलेले सरपंच यांच्या निधन,राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य करणा मुळे रिक्तझालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पद्धतीने राबविण्यात येणारा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

या संदर्भात भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 243 के व 243 झेडएअन्वये राज्यातील स्वराज्यसंस्था निवडणुकीचे पर्यवेक्षण,संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे.त्यानुसार राज्यातील ग्रामपंचायती मधील सदस्य, थेट निवडून आलेले सरपंच यांच्या निधन,राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य करणा मुळे रिक्तझालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी आयोगाच्या समक्रमांकाच्या संदर्भ क्र.3 वरीलच्या आदेशान्वये अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

त्यानुसार राज्यातील 2444 ग्रामपंचायती मधील थेट सरपंचाच्या व 3120 सदस्यांच्या रिक्त जगासाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यांतील रायगड जिल्हयात एकूण 127 ग्रामपंचायती असून या ग्रामपंचायती मध्ये प्रत्यक्षात 200 जागांसाठी पोट निवडणूक होणार आहे. त्यामध्ये थेट निवडून आलेले सरपंच रिक्त जागा-30, रिक्त सदस्यांच्या जागा170 जागां अशा एकूण 200 जागांसाठी ही निवडणूक होणार आहे.

**निवडणुकीचे टप्पे**

१ तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक

२ नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी)

नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्येनमूद केलेल्या ठिकाणी)

४ नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी)

५ निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ

६ आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक

मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दिनांक (गतगोजणीचे टिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निकित करतील त्यानुसार राहील)

८. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक

दिनांक

दिनांक ३०/०३/२०२६ (सोमवार)

दिनांक ०७/०४/२०२६ (मंगळवार) ते दिनांक १३/०४/२०२६ (सोमबार) वेळ स.११.०० ते दु.३.००

(दिनांक ११/०४/२०२६ चा शनिवार व दिनांक १२/०४/२०२६ चा रविनार वगळून)

दिनांक १५/०४/२०२६ (बुधवार)

वेळ सकाळी ११.०० वा. पासून छाननी संपेपर्यंत

दिनांक १७/०४/२०२६ (शुक्रवार) दुपारी ३.०० वा. पर्यंत

दिनांक १७/०४/२०२६ । शुक्रवार) दुपारी ३.०० वा. नंतर

दिनांक २८/०४/२०२६ (मंगळवार)

सकाळी ७.३० वा. पासून ते सायं. ५.३० वा. पर्यंत (नक्षलग्रस्त व दुर्गम भागासाठी उदा. गडचिरोली, गोंदीया जिल्ह्यासाठी सकाळी ७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)

दिनांक २९/०४/२०२६ (बुधवार)

दिनांक ०६/०५/२०२६ (बुधवार) पर्यंत

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

# ओबीसींच्या मागण्यांसाठी जंतर-मंतरवर एल्गार

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया/भंडारा जिल्हा प्रतिनिधी :** जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, केंद्रात स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन करावे. क्रिमिलेयरची मर्यादा वाढवावी, यांसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज २३ मार्च रोजी दिल्लीतील ऐतिहासिक जंतर-मंतरवर ओबीसी समाजाने भव्य धरणे आंदोलन केले. 'ओबीसी समाज की जनगणना करो', 'हम हमारा हक मांगते, नही किसीसे भीक मांगते' अशा घोषणांनी दिल्लीचा परिसर दणाणून गेला होता. विशेष म्हणजे, भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या क्रांतिकारकांना अभिवादन करून या आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. राष्ट्रीय ओबीसी महासंघ, ओबीसी महासभा व बीसी वेलफेअर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आंदोलनात देशभरातील हजारो ओबीसी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपला सहभाग




नोंदवला.

**खासदारांची उपस्थिती आणि बळ**

या आंदोलनाची तीव्रता पाहून अनेक खासदारांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. यामध्ये प्रामुख्याने चंद्रपूरच्या खासदार प्रतिभाताई धानोरकर, चिमूरचे खासदार मनोहर किरसाण, भंडारा-गोंदियाचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे, खासदार बळवंत वानखेडे, खासदार शाम बर्वे,भिवंडीचे खासदार सुरेश ऊर्फ बाळूमामा म्हात्रे यांचा समावेश होता. या लोकप्रतिनिधींनी आंदोलकांना मार्गदर्शन करताना "ओबीसींच्या न्याय्य हक्कासाठी आम्ही संसदेत आवाज उठवू," असे आश्वासन दिले.

ओबीसी प्रवर्गाची तात्काळ जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, ओबीसी हिताचे 'UGC समता विधेयक २०२६' त्वरित लागू करावे, केंद्रात स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन करावे,क्रिमिलेयरची उत्पन्न मर्यादा वाढवून २० लाख रुपये करण्यात यावी.

या देशव्यापी आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे व महासचिव सचिन राजूरकर यांनी केले. या आंदोलनात भंडारा जिल्ह्यातून डॉ. मुकेश पुडके, यांनी प्रतिनिधित्व केले. देशभरातील विविध प्रतिनिधी दिल्लीच्या या ऐतिहासिक धरणे आंदोलनाला उपस्थित होते "जर केंद्र सरकारने आमच्या या रास्त मागण्यांची वेळीच दखल घेतली नाही, तर आगामी काळात दिल्लीतील रामलीला मैदानावर यापेक्षाही तीव्र आणि देशव्यापी आंदोलन छेडले जाईल," असा स्पष्ट इशारा ओबीसी संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे.आता केंद्र सरकार या मागण्यांवर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण देशातील ओबीसी समाजाचे लक्ष लागले आहे.

# PMC गार्डनमधील सुविधांकडे दुर्लक्ष; तातडीने सुधारणा करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**खारघर, (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेच्या सेक्टर २०, शिल्प चौक परिसरातील PMC गार्डनमध्ये मूलभूत सुविधा व देखभालीच्या गंभीर समस्या निर्माण झाल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेविका सौ. परेशा बृजेश पटेल यांनी आयुक्तांकडे तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

सदर उद्यानाचा वापर परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुले मोठ्या प्रमाणावर करत असले तरी अनेक अडचणींमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः सकाळच्या वेळेत सुरक्षारक्षक नसल्याने ज्येष्ठ नागरिकांनाच गेट उघडावे लागते, ज्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे.उद्यानाभोवती असलेले लोखंडी कुंपण कमी उंचीचे व अपूर्ण असल्याने काही जण भिंतीवरून उड्या मारून आत प्रवेश करतात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने धोका वाढला असून यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

तसेच उद्यानात बसविण्यात आलेल्या ओपन जिमची स्थितीही अस्पष्ट असून अनेक साधने वापरण्यायोग्य नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. संध्याकाळच्या वेळेत बहुतेक गार्डन लाईट्स बंद असल्यामुळे अंधाराचे साम्राज्य पसरते आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो.

उद्यानात तुटलेली बाकडी, सिमेंटचे अवशेष व इतर अनावश्यक वस्तूंचा साठा असल्यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. याशिवाय मुख्य प्रवेशद्वाराजवळील पादचारी मार्गही खराब अवस्थेत असून नागरिकांच्या हालचालीस अडथळा निर्माण होत आहे.या सर्व समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी नगरसेविका सौ. परेशा पटेल यांनी प्रशासनाकडे केली आहे. उद्यानात स्वच्छता, सुरक्षितता व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास नागरिकांना उत्तम वातावरणात फिरण्याचा व व्यायामाचा लाभ मिळू शकणार आहे.

# जवाहर नवोदय व सातारा सैनिक स्कूल परीक्षेत ज्ञानसागर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थीचे यश

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी विजय खुडे :**

**आखाडा बाळापूर:** जाहीर झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या निकालात ज्ञानसागर इंग्लिश स्कूलचे विद्यार्थ्यांनी जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा व सातारा सैनिक स्कूल परीक्षेत घव घवीत यश मिळविले आहे.

यामध्ये कु. आराध्या धनंजय देशमुख हिने ९५ टक्के गुण, नव्या संजय बोंढारे हिने ९१.२५ टक्के गुण, सर्वेश दीपक बोंढारे याने ९० टक्के, चैतन्य भाऊराव शिंदे याने ९० टक्के, श्रेया ज्ञानेश्वर आकोशकर ९० टक्के, आयुष साहेबराव रायघोल ८८.७५ टक्के गुण मिळवले आहेत . या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार




शाळेचे अध्यक्ष बाळासाहेब हेंद्रे यांच्या वतीने करण्यात आला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक काजळे, श्यामसुंदर शिंदे, दिवटे, लुटे, भिवकर, लहाने यासह सर्व शिक्षक उपस्थित होते. या गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने कौतुक करण्यात येत आहे. व ज्ञानसागर इंग्लिश स्कूल चे सर्वत्र कौतुक होतं आहे या यशा माघे शिक्षक व शाळेची सुद्धा मेहनत दिसून येत आहे

# चिंतामणी निवासी मतिमंद विद्यालय पुलगाव विद्यालयाला"'उत्कृष्ट शाळा "चा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशेमहागांव (यवतमाळ ) :** चिंतामणी निवासी मतिमंद विद्यालय पुलगाव या शाळेला शैक्षणिक सत्र 2024-25 करिता "दिशा इम्प्लिमेंटेशन स्कूल " उत्कृष्ट शाळा म्हणून गौरविण्यात आले हा सन्मान शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.जिल्हा परिषद वर्धाचे मुख्यकार्यकारी अधिकारी मा. श्री.पराग सोमण यांच्या हस्ते तसेच जिल्हा सक्षमीकरण अधिकारी मा.सौ. प्रतिभा भागवतकर मॅडम व सहायक



सल्लागार मा. सौ सोनाली शिंदे मॅडम यांच्या उपस्थित हा पूरस्कार शाळेचे मुख्याध्यापक श्री. नंदकिशोर मुरकुटे व सहाय्यक विशेष शिक्षक श्री. जायसखान पठाण यांना प्रदान करण्यात आला.तसेच हा पुरस्कार मिळण्याचे मोठे योगदान शाळेचे सर्व विशेष शिक्षक श्री. राहुल कुऱ्हाटकर, श्री. रवी घायवट, श्री. राम परतेकी, कु. सरिता भगत, श्री. संजय जाधव, श्री. राजेंद्र मोघे कला शिक्षक आदी चे आहे.

यावेळी दिशा नागपूर विभागाचे समन्वयक मा.सौ. रोशनी गौर व मा. श्री. अभय रोठे यांची ही विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात शाळेची कार्याची प्रशसा करण्यात आली असून दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नाचे कौतुक करण्यात आले. या सन्माना मुळे शाळेचे शिक्षकवर्ग व कर्मचाऱ्यामध्ये उत्साहाचे वातावरण असून, भविष्यातही विद्यार्थ्यांच्या प्रगती साठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# येवला चिचोंडी देवगाव मार्गे नाशिक बस सुरू, देवगाव ग्रामस्थांनी केले बसचे स्वागत

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी**

**राजेश भडांगे :-** अनेक दिवसांपासून येवला- चिचोंडी -देवगाव मार्गे नाशिक बस सुरू करण्याची मागणी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगन भुजबळ यांच्याकडे देवगावचे माजी सरपंच विनोद जोशी, माजी पंचायत समितीचे सदस्य भाऊसाहेब बोचरे, देवगाव विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे संचालक धनजंय जोशी यांनी केली होती.देवगाव परिसरातील प्रवाशांची मागणीनुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे यांच्या सूचनेने येवला- चिचोंडी -देवगाव मार्गे नाशिक आजपासून सुरू झालेल्या नवीन बसचे स्वागत ग्रामस्थांनी केले. यावेळी बाळासाहेब लोखंडे, लासलगाव बाजार समितीचे संचालक डॉ. श्रीकांत आवारे, लासलगाव खरेदी विक्री संघाचे संचालक भाऊसाहेब बोचरे, माजी सरपंच विनोद जोशी, माजी जिल्हा परिषद सदस्य कृष्णराव गुंड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून बसचे स्वागत करण्यात आले. सहाय्यक वाहतूक निरीक्षक नारायण भागवत यांचा सत्कार विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन शांताराम ढवळे यांनी, बस चालक एस.एस.भागवत यांचा सत्कार भास्कर बोचरे, यांनी तर वाहक ए.के.सानप यांचा सत्कार बाबुराव कुलथे यांनी ग्रामस्थांच्या वतीने केला.

देवगाव, महादेवनगर, वाकद, शिरवाडे, मानोरी, रुई, नांदगाव, कानळद, कोळगाव, खेडले, धानोरे, धारणगाव वीर, धारणगाव खडकसह परिसरातील गावांतील बसने प्रवास करणाऱ्या व्यापारी, कामगार, नोकरदार, विद्यार्थ्यासह प्रवाशांची गैरसोय



होत होती. त्यामुळे येवला- चिचोंडी -देवगाव मार्गे नाशिक बस सुरू करण्याची मागणी देवगावचे माजी सरपंच विनोद जोशी, माजी पंचायत समितीचे सदस्य भाऊसाहेब बोचरे, देवगाव विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे संचालक धनजंय जोशी, मनोहर बोचरे यांनी मंत्री ना.छगन भुजबळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे यांच्याकडे केली होती. त्यांनी या समस्येची दखल घेत राज्य परिवहन महामंडळास बस सुरू करण्यास निर्देश दिले होते. त्यांच्या निर्देशानुसार राज्य परिवहन महामंडळाच्या वाहक नियंत्रक यांनी बस सुरू केल्याने परिसरातील गावातील प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

याप्रसंगी सतिष लोहारकर, संतोष हुजबंद, राजेंद्र मेमाणे, आबूभाई काद्री, सचिन बोचरे, रेवणसिद्ध लोहारकर, प्रमोद तुपे, संपतराव आढागळे, राजेंद्र कांबळे, मनोज जोशी, बाबासाहेब सोमवंशी, सोमनाथ निलख, निखिल चव्हाण, विलास शिरसाठ, योगेश बोचरे, योगेश कुल्थे बाबुराव कुलथे,सचिन कूलथे,पांडुरंग कुलथे, जगन बोचरे, बन्सीभाऊ अढागळे ,दिलीप चव्हाण, त्र्यंबक पेंढारकर, पुरुषोत्तम लोहारकर,प्रल्हाद गोसावी,गणेश खुळे,संदीप गायकवाड आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते

# शिव स्वामी फाउंडेशन सत्कार सोहळा व स्वाक्षरी मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : मानव हक्क व माहिती अधिकार जनजागृतीचे कार्य तसेच शैक्षणिक, सामाजिक इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिव स्वामी फाउंडेशनच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात कार्य कतृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या शुर महिलांचा शिव स्वामी कतृत्ववान महिला सन्मानाने गौरव करण्यात येणार आहे.

ठाणे येथील जी. जी. एज्यूकेशन पॅरामेडिकल सायन्स येथील सभागृहात साजरा होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महिला नगरसेविका, महिला पोलीस अधिकारी इत्यादींची उपस्थिती लाभणार असून, त्यांच्या हस्तेच UPSC परिक्षेत उतीर्ण झालेल्या तसेच शैक्षणिक, सामाजिक, राजकीय,वैद्यकीय, उद्योजक अशा अनेक क्षेत्रात नेत्रदिपक कार्य करणा-या रणरागिणीचा प्रशस्तीपत्र स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळ्याच्या अनुषंगाने मनुष्य आपल्या जीवनात ज्या स्वाक्षरी चा वापर करतो त्या स्वाक्षरी चा जीवनावर किती सकारात्मक नकारात्मक परिणाम होतो सही कशी असावी, कोणत्या सही मुळे जीवनात अडचणी येतात व कोणत्या सही मुळे जीवनात प्रगती होते याबाबत चे संपुर्ण स्वाक्षरी मार्गदर्शन डॉ शिंगारे मॅडम मार्फत करण्यात येणार आहे.

याप्रसंगी शिव स्वामी फाउंडेशनचे संस्थापक हिरादास सोनावले, प्रदेश अध्यक्ष नरेंद्र पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष विलास सावंत, प्रदेश को षाध्यक्ष राजकुमार शर्मा, प्रदेश संपर्कप्रमुख राजेंद्र मालवे, प्रदेश उपसंपर्कप्रमुख जयवंत मसणे, प्रदेश संघटक ज्ञानेश्वर खैरे, प्रदेश उपाध्यक्ष रामदास वाढवणे, जाकिर अली शेख, ठाणे जिल्हा अध्यक्ष रमेश राऊत , कार्याध्यक्ष श्रीधर घुंबरे , जिल्हा संपर्कप्रमुख अनिल मोरये इत्यादी पदाधिकारीही यावेळी उपस्थित राहणार आहेत.

# पनवेल तालुका पोलिसांनी राबवले ऑल आउट आणि कोंबिंग ऑपरेशन



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल तालुका पोलिसांनी 24 मार्च रोजी रात्रीच्या सुमारास ऑल आउट आणि कोंबिंग ऑपरेशन राबवले.यावेळी अमली पदार्थांच्या दोन कारवाया करण्यात आल्या तसेच एका इसमांकडून कोयता जप्त करण्यात आला. महाराष्ट्र दारूबंदी अंतर्गत पाच कारवाया करण्यात आल्या तर दारूबंदी अधिनियम 93 अंतर्गत एक कारवाई करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी धोकादायकरीत्या रहदारीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी दोन वाहनांवर कारवाई केली. गुटक्याच्या दहा कारवाई करण्यात आल्या. ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान पाच वॉरंट बजावणी करण्यात आली. नऊ समन्सची बजावणी करण्यात आली. ऑल आऊट आणि कोंबिंग ऑपरेशन दरम्यान एकूण दहा गुन्हे दाखल करण्यात आले. यावेळी आठ अधिकारी आणि 42 पोलिस अंमलदार हजर होते.

# रमजान ईद निमित्त प्रशांत राठोड यांनी मुस्लिम बांधवांच्या भेटी घेऊन दिल्या शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर (प्रतिनिधी) सय्यद ईसा :** मंत्रालयीन सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांचा प्रवास लोकनेते या शब्दाला साजेसा सुरू असल्याने तालुक्यासह मुंबईत आलेल्या सर्व धर्मीयांना प्रत्येक कामात मदत करणे यासाठी त्यांचे नाव दोन्ही तालुक्यात प्रथम क्रमांकावर चर्चिले जात असल्याने सर्व धर्मीयांच्या सण-उत्सवासह लग्न निधन तसेच कुठलीही जयंती पुण्यतिथी सामाजिक कार्यात कोणाच्या निमंत्रणाची वाट न पाहता मदत करण्यासाठी हजर राहत असल्याने झालेल्या रमजान ईद निमित्त माहूर शहरात येऊन त्यांनी सर्वसामान्य मुस्लिम बांधवांसह गन मान्य नागरिकांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्याने शहरात सध्या त्यांच्याच नावाची चर्चा होताना दिसत आहे

माहूर किनवट तालुक्यात प्रशांत भाऊ राठोड यांनी वृक्ष लागवडीपासून जंगलात जंगली जनावरांसाठी पिण्याचे पाणी उपलब्धते पासून ते जात धर्म न पाहता अनाथ मुलींचे लग्न पुण्यतिथी जयंती सार्वजनिक कामांचे मेळावे तसेच भाईचारा सर्व धर्म समभाव टिकून राहावा यासाठी त्यांचे अहोरात्र प्रयत्न असतात सुट्टीच्या दिवशी वेळ वाया न घालवता तालुक्यातील छोटे मोठे लग्न समारंभ किंवा सामाजिक होत असलेल्या सर्व कार्यात कुठल्याही निमंत्रणाची मानपानाची वाट न पाहता ते हजर राहून सर्व धर्मीयांना सढळ हाताने मदत करत असतात



पवित्र रमजान ईद निमित्त त्यांनी थेट माहूर शहर गाठून शहरातील मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या यावेळी ज्येष्ठ पत्रकार तथा सन्माननीय नागरिक कादरभाई दोसानी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सरफराज दोसानी प्रतिष्ठित व्यापारी सलीम भाई खाकरा यासीन भाई बाणानी तास किराणा चे संचालक इसाक भाई पत्रकार रफिक भाई गाईड शेख साबीर शेख उस्मान नगरसेवक प्रतिनिधी निसारभाई कुरेशी फिजा जनरल स्टोअर्स चे संचालक जाबीर भाई आतार फिरोज भाई अप्सरा जनरल स्टोअर चे संचालक आयुब भाई उस्मान भाई बत्ती वाले महमूद भाई शब्बीर भाई रहीम किराणाचे चे संचालक रहीम भाई आरिफ भाई यांचे सह ताज किराणाचे संचालक वसीम भाई सहारा स्टील येथे सौदागर यांचे सह शेकडो मुस्लिम बांधवांची त्यांनी यावेळी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या माहूर शहरासह वाईबाजार येथील हाजी उस्मान खान चांदखान पठाण यांचे सह शेकडो मुस्लिम बांधवांना त्यांनी भेट घेत गोंडवाडसा येथीलही मुस्लिम बांधवांची भेट घेतली

यावेळी त्यांचे सोबत श्री दत्तकृपा टी स्टॉलचे संचालक विजय भाऊ कांबळे किसन राठोड पत्रकार दत्तात्रय शेरेकर दिनेश पवार बंडू राठोड प्रदीप पवार रवि वायकुळे संजय गायकवाड बोधडी चे अशोक राजूरवार करण गेडाम यांचे सह मोठ्या संख्येने सर्वधर्मीय नागरिक उपस्थित होते.

# अवघ्या आशा श्रीरामार्पण' कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** श्री रामनवमीचे औचित्य आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल, उत्तर रायगडच्या वतीने एका विशेष सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.' अवघ्या आशा श्रीरामार्पण' या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमातून गीत रामायणाच्या माध्यमातून रामतत्त्वाची कालसुसंगत मांडणी २२ मार्च रोजी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अत्यंत दिमाखात सादर करण्यात आली. भक्ती, संस्कृती आणि सुरेल संगीताचा त्रिवेणी संगम असलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित शेकडो रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमाला भेट देऊन सादरीकरणाचा आस्वाद घेतला. रामायणातील विचार आजही तितकेच प्रेरणादायी असून संगीताच्या माध्यमातून ते लोकांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. या सांस्कृतिक सोहळ्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, आयोजक व नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, गणेश कडू, सुमित झुंजारराव, माजी नगरसेविका सारिका भगत, रुपेश नागवेकर, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, श्याम पुंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात स्नेहल दामले यांनी प्रभावी कथनातून रामायणातील प्रसंग जिवंत केले, तर अभिजीत पंचभाई आणि श्रुती देवस्थळी यांच्या भावपूर्ण गायनाने वातावरण भक्तिमय झाले. त्यांना उद्धव कुंभार, अमित कुंटे आणि प्रसन्न बाम यांनी दर्जेदार वाद्यसंगत दिली.

# पेट्रोल, डिझेलचा जिल्ह्यात पुरेसा साठा अफवांवर विश्वास ठेवू नका ;जिल्हाधिकारी डॉ . विपीन इटनकर यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल, गॅससाठा मुबलक प्रमाणात असून त्याचे प्रशासनामार्फत काटेकोर सनियंत्रण केले जात आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे वरिष्ठ पातळीवरून नित्य आढावा घेत आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्याला आवश्यक तेवढीच खरेदी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ विपीन इटनकर यांनी केले.


कुणाच्या मनात जर भीती असेल तर त्यांनी मनातून काढून टाकावी. जिल्ह्यात कुठलीही पॅनिक स्थिती नसून नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी यांनी सांगितले.पेट्रोल, डिझेल, गॅस व इतर उर्जेबाबत केंद्र शासन तसेच राज्य सरकारकडूनही यापूर्वीच स्पष्ट माहिती देण्यात आलेली आहे. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य शासनाने विविध अत्यावश्यक बाबींच्या सनियंत्रणासाठी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या अनुषंगाने जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे. वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. नागरिकांनी पॅनिक होऊ नये, असेही आवाहन जिल्हाधिका-यांनी यावेळी केले. अत्यावश्यक सेवेबाबत चुकीच्या अफवा पसरविणाऱ्यांबद्दल अथवा यात अडथळा आणणा-यांवर पोलिसांच्या मदतीने कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

# पनवेल तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राबवण्यात आले ऑल आउट व कोम्बींग ऑपरेशन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात परिमंडळ 03 पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहिते व सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली ऑल आउट व कोम्बींग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले. या कोंबिंग ऑपरेशन दरम्यान डी बी मार्ग पोलीस स्टेशन मध्ये आरोपी नामे राकेश विश्वनाथ महामुनकर वय 44 या पाहिजे आरोपी यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले.

यामध्ये एनडीपीएस भारतीय हत्यार कायदा, दारूबंदी अधिनियम, रहदारीस अडथळा निर्माण करणे, गुटका व तंबाखू जन्य पदार्थबंदीप्रमाणे एकूण १० गुन्हे नोंदवण्यात आले. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील हिस्ट्री सीटर एकूण ११ चेक केले त्यातील ६ मिळून आले तसेच गुंड ९ चेक केले असता ३ मिळून आले. तसेच एकूण ५ वॉरंट बजावणी, ९ समन्सची बजावणी, ७ पाहिजे व फरारी आरोपी, ४ लॉज चेकिंग करण्यात आले. त्याचप्रमाणे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये २ ठिकाणी नाकाबंदी नेमण्यात आली होती.



यामध्ये नाकाबंदी दरम्यान 57 वाहने पाहणी करून १० वाहनांवर कारवाई करण्यात आली. सदर ऑल आऊट ऑपरेशन करिता वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह ८ अधिकारी आणि ४२ पोलीस अंमलदार हजर होते.

# मुरुडमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी; मानव कल्याणासाठी विशेष दुवा

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण प्रतिनिधी मोहम्मद पिंजारी :** शहरात काल रमजान ईद (ईद-उल-फित्र) मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. तीस दिवसांच्या पवित्र रोज्यानंतर मुस्लिम बांधवांनी सकाळी मोठ्या संख्येने ईदगाह मशिदीत एकत्र येत ईदची नमाज अदा केली. सणानिमित्त शहरात पहाटेपासूनच आनंद, उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत होते.

नमाज पठणानंतर नय्युम सय्यद मौलाना यांनी मानव कल्याण, देशाची प्रगती तसेच समाजात शांतता, बंधुता आणि सौहार्द नांदावे यासाठी विशेष दुवा (प्रार्थना) केली. त्यानंतर





उपस्थितांनी एकमेकांना 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा देत सणाचा आनंद साजरा केला. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी नवीन कपडे परिधान करून उत्सवात



उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सणानिमित्त कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मुरुड पोलीस स्टेशनचे एपीआय उजगरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी त्यांच्या संपूर्ण टीमने उपस्थित राहून नागरिकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. पीएसआय हनुमंत नागरगोजे, तसेच खोपे, सूर्यवंशी, हिंगमिरे, महेश पवार आदी पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी कार्यरत होते.

तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व युवक काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच विविध सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठा गजबजलेल्या दिसून आल्या असून नागरिकांनी एकमेकांच्या घरी भेटी देत सणाचा आनंद द्विगुणित केला.सर्व धर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला. रमजान ईदच्या निमित्ताने मुरुड शहरात बंधुता, ऐक्य आणि शांततेचे वातावरण अधिक दृढ झाल्याचे सकारात्मक चित्र पाहायला मिळाले.

# कासरगोडमध्ये भाजप-एनडीएचे शक्तीप्रदर्शन; अश्विनी एम.एल. यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** केरळ विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत कासरगोड मतदारसंघात भारतीय जनता पक्ष आणि एनडीए आघाडीने मोठे शक्तीप्रदर्शन करत अधिकृत उमेदवार अश्विनी एम.एल. यांनी आपला उमेदवारी अर्ज अत्यंत उत्साही वातावरणात आणि कार्यकर्त्यांच्या प्रचंड जनसमुदायात दाखल केला. याप्रसंगी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रभारी म्हणून प्रमुख उपस्थिती होती. उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. ढोल-ताशांचा गजर, भारत माता की जयच्या घोषणा आणि हातात भाजपचे झेंडे घेतलेले हजारो समर्थक यावेळी रस्त्यावर उतरले होते. या रॅलीने संपूर्ण कासरगोड शहर भगवेमय झाले होते. मतदारांचा वाढता पाठिंबा आणि कार्यकर्त्यांमधील हा अभूतपूर्व जोश पाहता, या मतदारसंघात यावेळी निश्चितपणे परिवर्तन होऊन भाजप महायुतीचा विजय होईल, असा ठाम विश्वास आमदार प्रशांत ठाकूर आणि इतर नेत्यांनी यावेळी व्यक्त केला. या सोहळ्यासाठी कर्नाटकचे आमदार हरेश पुंजा, आमदार गुरुराज गंटीहोळी, प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेत्री हर्षिका पूजनाचा, पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती तथा नगरसेवक संतोष शेट्टी, शिवाजी भगत, अक्षय सिंह, जयचंद्रन वासु, शिवाजी शेट्टी, सुभाष शेट्टी, अभिलाष शेट्टी, सुजीत पुजारी यांच्यासह एनडीएचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मुंबईत 'महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' सोहळा; २५-२६ मार्च रोजी आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे देण्यात येणारा 'महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' सोहळा दिनांक २५ व २६ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. याबाबत माहिती प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग मुंबईचे श्री. बाळासाहेब सोळंकी यांनी दिली आहे.

हा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात पार पडणार असून, कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री Devendra Fadnavis, उपमुख्यमंत्री Eknath Shinde, उपमुख्यमंत्री Sunetra Pawar, सामाजिक न्याय मंत्री Sanjay Shirsat, राज्यमंत्री Madhuri Misal यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या सोहळ्यात व्यसनमुक्ती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुमारे १०० व्यक्ती तसेच १३ संस्थांना सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये लेखक, कवी, पत्रकार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय कर्मचारी तसेच सेवाभावी संस्थांचा समावेश आहे.कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी, २५ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता गेटवे ऑफ इंडिया (भारत प्रवेशद्वार) ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह दरम्यान व्यसनमुक्ती जनजागृती दिंडी काढण्यात येणार आहे. तसेच विविध चर्चासत्रे, उद्घाटन सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.दि. २६ मार्च रोजी सकाळी ११.०० वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजात व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण होण्यास चालना मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे

## बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय समता पुरस्कार सुभाष लोखंडे यांना प्रदान



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी प्रकाश गवारे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने दिला जाणारा राज्यस्तरीय समता पुरस्कार यंदा नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक व समतामूल्यांच्या जपणुकीसाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कांशीराम यांच्या जयंतीनिमित्त, मान्यवर कांशीरामजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यंदाचा पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी शहरातील आय.टी.आय. रेस्ट हाऊस सभागृहात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन समाज पार्टीचे प्रदेशाध्यक्ष विलास गरुड हे होते. यावेळी काशी माया प्रबोधन मंचाचे अध्यक्ष आयु. तुकाराम टोम्पे, लॉर्ड बुद्धा टीव्हीचे पत्रकार आयु. सदाशिव गच्चे, सामाजिक कार्यकर्त्या कौशल्या ताई संभाजी रणवीर, संस्थेचे अध्यक्ष राहुल कोकरे, बी. एस. गोडबोले, आयु. सुनील कोकरे, रंगनाथ कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून समाजात समता, बंधुता व सामाजिक ऐक्याचा संदेश देण्याचा संस्थेचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. अशा पुरस्कारांमुळे समाजातील कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळते, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# चिरनेर येथील हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धाराचे भूमिपूजन

## दानशूर समीर पाटील यांच्या स्वनिधीतून होणार मंदिराची उभारणी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्री हनुमान मंदिराच्या जिर्णोद्धाराचे भूमिपूजन शनिवारी दि. 21 चिर्ले येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे, दानशूर व्यक्तिमत्व तथा हनुमानभक्त समीर पाटील यांच्या हस्ते अभिषेक, विधिवत पूजन व पुरोहितांनी म्हटलेल्या मंत्रघोषातून, श्रीफळ वाढवून, करण्यात आले.



चिरनेर गणपती देवस्थानातील हे कौलारू हनुमान मंदिर जीर्ण झाले होते. या मंदिरातील श्री हनुमानाची मूर्ती ही भव्य पाषाणी व पुरातन आहे. गणपती तीर्थस्थानातील हनुमान मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा हे ग्रामस्थांबरोबर भक्तगणांना वाटत होते. दरम्यान दानशूर व्यक्तिमत्व तथा हनुमानभक्त समीर पाटील यांना मंदिराच्या जीर्णोद्वाराची माहिती मिळताच त्यांनी गणपती देवस्थानच्या पदाधिकारी व ग्रामस्थांबरोबर संपर्क साधला. आणि समीर पाटील यांनी आपल्या स्वखर्चातून या हनुमान मंदीरासह समोरील सभामंडप उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

शनिवारी हनुमान मंदिराच्या नियोजित जागेचे समीर पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. विशेषता: हनुमान मंदिर व समोरील भव्य सभामंडप हे समीर पाटील यांच्या आर्थिक मदतीतून उभारले जाणार असून, या मंदिराच्या उभारणीच्या संपूर्ण कामाची देखरेख चिरनेर ग्रामस्थ, गणपती देवस्थान ट्रस्ट व गणपती उत्सव कमिटीच्या नेतृत्वाखाली केली जाणार आहे.

अशी माहिती गणपती देवस्थानचे महेंद्र पाटील, मंगेश पाटील, अमर ठाकूर, संजय मोकल, मंगेश पाटील, विजय पाटील, चंदन कडू, अमित मुंबईकर, गणेश पाटील, कैलास पाटील, नरेश पाटील यांच्यासह चिरनेर मुळपाडा गाव कमिटीचे सुजित पाटील, किरण भाकुर्लेकर, मयूर म्हात्रे, सुनीत ठाकूर, प्रीतम ठाकूर, मिथुन पाटील, सुशील पाटील, शुभम मुंबईकर यांनी दिली.

याप्रसंगी सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच अरुण पाटील, शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, पोलीसपाटील संजय पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, माजी उपसरपंच सचिन घबाडी, शेकापचे सुरेश पाटील, राष्ट्रवादीचे संतोष ठाकूर, पुरोहित जगदीश जोशी, बी सी ठाकूर,जयराम ठाकूर, गोमा ठाकूर, हिराजी ठाकूर, के बी ठाकूर, भास्कर ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. या मंदिराच्या बांधकामाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला असून येत्या जुलै महिन्याच्या अखेरीस या हनुमान मंदिराचे बांधकाम पूर्णत्वास जाईल. अशी ग्वाही दानशूर समीर पाटील यांनी यावेळी दिली.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने केंद्रीय शिक्षक, शिक्षका व बौद्धाचार्य परीक्षा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी -प्रकाश गवारे :** भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा नांदेड (दक्षिण) यांच्या वतीने केंद्रीय शिक्षक, शिक्षका व बौद्धाचार्य परीक्षेचे भव्य व शिस्तबद्ध आयोजन करण्यात आले. समाजातील शैक्षणिक व बौद्धिक उन्नतीस चालना देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन व बुद्ध वंदनेने करण्यात आली.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी बुद्ध-आंबेडकरी विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या परीक्षेस एकूण ३५ विद्यार्थी व विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. परीक्षेचे नियोजन अत्यंत



काटेकोरपणे करण्यात आले असून, सर्व परीक्षार्थींनी शिस्त व गांभीर्याने परीक्षा दिली. या उपक्रमामुळे समाजातील युवकांमध्ये बौद्ध धम्माविषयीची जागरूकता आणि अभ्यासाची आवड वाढीस लागेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पि. एम. वाघमारे सर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिक्षण, शिस्त व संघटन यांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नाकर महाबळे सर यांनी प्रभावीपणे केले.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड सर, जिल्हा सरचिटणीस दामोदर सरकटे सर, बी. डी. कांबळे सर, केंद्रीय शिक्षक यानभूरे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच चैत्यभूमी, मुंबई येथून संतोष मटकर सर यांनी परीक्षार्थी म्हणून विशेष सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

कार्यक्रमात सुरेश गजभारे, जनरल मेजर आनंद झाडते, मेजर लेफ्टन कर्नल एस. एन. हनुमंते, शहर उपाध्यक्ष आनंद जोंधळे, शहर सचिव व सीनियर डिव्हिजन ऑफिसर कृष्णा गजभारे यांचीही उपस्थिती लक्षणीय होती.

महिला पदाधिकाऱ्यांचा सहभाग देखील विशेष उल्लेखनीय ठरला. उत्तर महिला अध्यक्षा अनिता ताई खंदारे, महिला कोषाध्यक्ष कुसुमताई गवारे यांनी सक्रिय उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या शेवटी दक्षिण महिला अध्यक्षा रेखाताई पंडित यांनी सर्वांचे आभार मानले.

एकूणच, हा परीक्षा उपक्रम संघटनात्मक बांधिलकी, शिस्त आणि सामाजिक जाणीव यांचे उत्कृष्ट उदाहरण ठरला असून, भविष्यात अशा उपक्रमांद्वारे बौद्ध धम्माचा प्रसार अधिक व्यापक करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

## कामोठे मध्ये रेल्वे स्थानक परिसर व अग्निशमन दलासाठी राखीव प्लॉट वरती अतिक्रमणाविरोधी कारवाई



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती ‘क’ अंतर्गत अतिक्रमण विभागाच्या वतीने कामोठे येथील मानसरोवर रेल्वे स्थानक परिसरात अतिक्रमणाविरोधी कारवाई करण्यात आली. तसेच अग्निशमन दलासाठी राखीव असलेल्या प्लॉटवर झालेले अतिक्रमण हटविण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार मानसरोवर स्थानक परिसरात अनाधिकृतपणे उभारण्यात आलेल्या टपऱ्या व झोपड्यांवरती जेसीबीच्या सहाय्याने प्रभाग समिती ‘क’ च्या अतिक्रमण विभागाच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली. संबंधित विभागाच्या पथकाने नियोजनबद्धरीत्या ही मोहीम राबवून परिसर अतिक्रमणमुक्त केला. याचबरोबर कामोठे येथील अग्निशमन दलासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या प्लॉटवरती अनधिकृत टपऱ्या, हातगाड्या, स्टॉल्स उभारण्यात आले होते. उपायुक्त नानासाहेब कामठे व सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग अधिक्षक दशरथ भंडारी यांनी जेसीबीच्या सहाय्याने याठिकाणी तोडक कारवाई करून संपूर्ण प्लॉट रिकामा केला. महापालिकेच्या वतीने अशा प्रकारच्या अनधिकृत अतिक्रमणांवरती पुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रिटघर येथे शुभचिंतन समारंभाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, थोर देणगीदार व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर यांच्या संयुक्त विद्यमाने ‘लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष शुभचिंतन समारंभ’ आयोजित करण्यात आला आहे. हा समारंभ बुधवार, दिनांक २५ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता रीटघर येथे होणार आहे.लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, वाय. टी. देशमुख, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, पंचायत समिती सदस्या वर्षा केवारे, रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी एम. के. कोंगरे, सरपंच सुभाष भोपी, संस्थेचे सहाय्यक विभागीय अधिकारी व्ही. यू. जगताप तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूल कामोठे प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या समारंभात वारकरी संप्रदायातील ७५ जणांना भगवद्गीतेचे वाटप करण्यात येणार असून विद्यार्थ्यांकडून विविध कलागुणांचे सादरीकरणही केले जाणार आहे. या कार्यक्रमास पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, विलास भोपी, बळीराम भोपी, संजय पाटील, नवनाथ भोपी, वंदना भोपी, विष्णू भगत तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भारत भोपी, उपाध्यक्ष रमेश पाटील, पोलीस पाटील दीपक पाटील यांनी केले आहे.

# सिडकोच्या भूखंडाचा वापर बदल करण्यात आल्याने विकासकाचा फायदा; सिडकोचे तब्बल ५०० कोटींचे नुकसान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** तारांकित हॉटेल उभारण्याकरिता सिडकोने दिलेल्या भूखंडाचा वापर बदल करण्यात आल्याने पीव्हीपी स्टार हॉटेल्स प्रा. लि. या विकासकाचा फायदा झाल्याचे दिसून येत आहे. सिडको संचालक मंडळाच्या वापर बदल ठरावाचा फायदा घेत उच्च न्यायालयाकडून या भूखंडाचा व्यावसायिक वापर करण्याच्या मागणीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. पीव्हीपी स्टार प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निर्णयामुळे सिडकोचे तब्बल ५०० कोटींचे नुकसान होणार आहे.

सिडकोने विकासकासोबत ९ जुलै २०२५ रोजी केलेल्या सुधारित करारानुसार व यूडीसीपीआरमधील लागू धोरणानुसार आवश्यक शुल्क व प्रिमियम भरुन विकासकाला भूखंडाचा वापर बदल करून बांधकाम करता येईल असे न्यायालयाने स्पष्ट केले. एकीकडे तारांकित हॉटेल उभारण्यासाठी भूखंड पीची जाहिरात काढणारे सिडको व्यवस्थापन मात्र विकासकांशी हातमिळवणी करून फक्त तारांकित हॉटेल उभारण्यासाठी पी केलेल्या भूखंडाचा वाणिज्य तथा निवासी वापर बदल करून देण्यातच धन्यता मानत असल्याचे समोर आले आहे. उच्च न्यायालयात आपली बाजू खंबीरपणे मांडण्यास सिडकोचे अधिकारी व वकिलांना अपयश आल्यामुळे भविष्यात सिडकोला आर्थिक नुकसानीची भीती मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे. डिसेंबर २००६-०७ मध्ये सिडकोने सीबीडी बेलापूर सेक्टर-१५ मधील भूखंड क्रमांक १५ व. १६ (एकूण क्षेत्रफळ सुमारे १०,३७७.५० चौ. मी.) येथे स्टार हॉटेल उभारण्यासाठी निविदा काढली होती. या निविदेत पीव्हीपी व्हेंचर्स प्रा. लि. यांची निवड झाली आणि पुढे सर्व हक्क पीव्हीपी स्टार हॉटेल्स प्रा. लि. यांना हस्तांतरित करण्यात आले. कंपनीने सुमारे ८२.७० कोटी रुपयांचा लीज प्रीमियम भरून सिडकोशी करार केला होता. कंपनीने ३८.०३ कोटी रुपये अतिरिक्त लीज प्रीमियम भरून ९ जुलैला सिडकोसोबत सुधारित भाडेकरार केला आणि भूखंडाचा ताबा पुन्हा मिळवला.

# समर व्हॅकेशन प्लॅन करताय? ‘या’ ट्रॅव्हल टिप्स करा फॉलो

लवकरच उन्हाळ्याची सुट्टी सुरू होणार आहे. त्यानिमित्त अनेक जण लॉंग समर व्हॅकेशन प्लॅन करतात. बरेच लोक आपल्या कुटुंबासह हिल स्टेशन, वाळवंट किंवा समुद्रकिनाऱ्यावर जातात. मात्र या दिवसांत उन्हाचा पारा जास्त असतो. कडाक्याचे ऊन, घाम आणि गर्मीमुळे प्रवासाचा नीट आनंद घेता येत नाही. त्यामुळे प्रवास करताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. विशेषतः जर तुम्ही लहान मुलांसोबत व्हॅकेशन प्लॅन करत असाल तर काही गोष्टी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.



**कपडे**

आता व्हॅकेशन म्हंटले की अनेक जण स्टायलिश कपडे खरेदी करतात. पण उन्हाळ्यात कपडे फक्त स्टायलिश असून चालत नाही, तर ते आरामदायी असणे महत्त्वाचे आहे. कारण जास्त जाड फॅब्रिकचे कपडे घातले तर तुम्हाला प्रचंड उष्णता जाणवू शकते आणि घामाचा त्रासही होऊ शकतो. त्यामुळे उन्हाळ्यात प्रवास करताना सुती कपडे निवडा. सुती कपडे घाम शोषून घेतात आणि शरीराला हवा खेळती राहते. तसेच गडद रंगांचे कपडे घालणे टाळा. कारण यामध्ये जास्त गर्मी होते. नेहमी फिकट रंगांचे कपडे घाला. यामुळे तुमची संपूर्ण ट्रिप आरामदायी होते. लहान मुलांनाही जास्त घट्ट कपडे घालण्याऐवजी थोडे सैल कपडे घाला. यामुळे त्यांना चालताना किंवा फिरताना त्रास होणार नाही.

**आहार**

उन्हाळ्यात पचनशक्ती थोडी मंदावते. त्यातच प्रवास करताना अनेकदा आपण बाहेरचे स्ट्रीटफूड, मसालेदार, तळलेले पदार्थ खातो. हे पदार्थ पचायला जड असतात. जास्त मसालेदार पदार्थ खाल्याने शरीराचे तापमान वाढू शकते आणि शरीरात पाण्याची कमतरता भासू शकते. त्यामुळे पोटाचे त्रास किंवा जळजळ, पित्त होऊ शकते. म्हणून उन्हाळ्यात प्रवास करताना नेहमी हलके पदार्थ खाण्याचा प्रयत्न करा. शिवाय केळी, टरबूज, संत्री अशी रसाळ फळे खा. ही फळे बाहेर कुठेही सहज मिळतात. प्रवासात ही फळे खाल्याने शरीरात पाण्याची कमतरता भासत नाही. तुम्ही फळांचा ज्यूसही घेऊ शकता.

**हायड्रेशन**

उन्हाळ्यात प्रवास करताना अनेकदा आपण पाणी पिण्याकडे दुर्लक्ष करतो. मात्र त्यामुळे डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो. म्हणून तुमचे शरीर हायड्रेट राहील याकडे लक्ष ठेवा. फिरायला जाताना सोबत नेहमी पाण्याची बाटली ठेवा. केवळ तहान लागल्यावरच नव्हे तर थोड्या थोड्या वेळाने पाणी पीत राहा. शिवाय प्रवासात नारळ पाणी, लिंबू सरबत, ताक किंवा कोकम सरबत यांसारख्या पेयांचा समावेश करा. लहान मुले सोबत असताना बाहेर फिरायला गेलो की आपण आईस्क्रीम, कोल्ड्रींक सर्रास घेतो. पण त्यामुळे घशाला त्रास होण्याची शक्यता असते. पण कडक उन्हात जास्त थंड गोष्टी घेतल्याने घशाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे शक्यतो सोडा किंवा जास्त साखरेचे कोल्डड्रिंक्स घेणे टाळा.

**त्वचा आणि डोळ्यांची निगा**

कडक उन्हामुळे त्वचा आणि डोळ्यांचे नुकसान होते. त्यामुळे तुमचे स्किनकेअर चुकवू नका. तुमच्याकडे वेळ कमी असेल तर बाहेर उन्हात जाण्यापूर्वी त्वचेसाठी किमान सनस्क्रीन, मॉइश्चरायझर लावा. टॅनिंग टाळण्यासाठी शॉर्ट कपडे घालणे टाळा. तसेच डोळ्यांच्या संरक्षणासाठी सनग्लासेस आणि उन्हापासून बचावासाठी टोपी किंवा स्कार्फ वापरा. शक्य असल्यास स्वतःजवळ एक छोटी छत्री ठेवा.

**प्रवासाची वेळ**

दुपारी १२ ते ४ या वेळेत ऊन खूप कडक असते. त्यामुळे प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी सकाळी लवकर किंवा संध्या.

**हेही महत्त्वाचे:**

- उन्हाळ्यात प्रवास करताना वेट वाईप्स, ओआरएस, डोकेदुखी, उलट्या किंवा मळमळ यासाठी काही औषधे सोबत ठेवा.
- यादरम्यान जास्त हेव्ही मेकअप करणे टाळा. कारण घाम आणि उन्हामुळे तो खराब होऊ शकतो. कमीत कमी उत्पादने वापरून नॅचरल मेकअप कॅरी करा.
- उन्हाळ्यात सुट्ट्यांचा काळ असल्याने हॉटेल्स आणि फ्लाईटची तिकिटे महागतात किंवा फुल होतात, त्यामुळे नीट नियोजन करून १- २ महिने आधीच बुकिंग करा.
- या ऋतूत शक्यतो थंड हवेच्या ठिकाणी व्हॅकेशन प्लॅन करण्याला प्राधान्य द्यावे.